**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण प्रथम प्रश्नोत्तरे घेऊ या.

**मंत्रालय इमारती समोर एका शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या करणे या विषयावर म.वि.स. नियम 57 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत दिलेली सूचना**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही म.वि.स. नियम 57 अन्वये राज्यातील एका अत्यंत गंभीर अशा घटनेकडे लक्ष वेधीत आहोत. राज्यात हे काय सुरु आहे, हे आम्हाला माहीत नाही. राज्याला मान खाली घालावी लागेल अशा घटना मागच्या 2-3 दिवसांत घडलेल्या आहेत. मंत्रालयामधून आपल्या राज्यातील कोट्यवधी जनतेच्या विकासासंबंधी निर्णय होणे अपेक्षित असते. आम्हाला न्याय मिळेल, आमच्यासाठी निर्णय होतील, या दृष्टीने सर्व राज्यातील जनतेचे लक्ष मंत्रालयाकडे असते. त्या मंत्रालयासमोर नांदेड जिल्ह्यातील माधव कदम हा शेतकरी विष प्राशन करुन आत्महत्या करतो, ही राज्याच्या दृष्टीने लाजीरवाणी घटना आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील वाढत्या आत्महत्यांच्याबाबतीत आम्ही राज्य सरकारकडे सातत्याने हीच मागणी करीत आहोत की, आपण राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली पाहिजे. त्यांनी दिलेली मदत अतिशय तुटपुंजी आहे. या प्रश्नाबाबत आमची पहिल्या दिवसापासून अशी भूमिका आहे की, आम्हाला राजकारण करायचे नाही. परंतु, सरकार पुन्हा पुन्हा विरोधी पक्ष या विषयावर राजकारण करु पाहत आहे, अशाप्रकारचा आक्षेप घेत आहे. खरे म्हणजे हा गेल्या 4 वर्षांच्या नापिकीचा परिणाम आहे. हा दुष्काळ काही एकच वर्ष नाही तर, लागोपाठ 2-3 वर्षे तर काही भागातील 4 वर्षांतील दुष्काळाचा हा परिणाम आहे. यामध्ये शेतकऱ्यांची उत्पन्नाची सर्व साधने संपलेली आहेत. याकरिता 18 हजार कोटी रुपये किंबहुना जादा रकमेच्या पॅकेजची घोषणा करण्याबाबत गेल्या आठवड्यात सांगितले गेले की, सर्वात जास्त मदत केली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, राज्य स्थापनेनंतर प्रथमच मंत्रालयासमोर आमचा राज्याचा पोशिंदा असलेला शेतकरी येऊन आत्महत्या करीत आहे. मी सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय

...2/-



श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

सदस्यांना व सभागृहाला विनंती करणार आहे की, त्याला आज आपण या सभागृहात श्रध्दांजली वाहिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एवढी मोठी घटना होत असताना राज्य सरकारकडून मदतीच्या पॅकेजच्या फक्त घोषणा केल्या जातात. एवढे मोठे पॅकेज दिल्याचे सरकार सांगत आहे, तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्याऐवजी वाढत चालल्या आहेत. आता मंत्रालयासमोर येऊन शेतकरी आत्महत्या करीत आहे. मग काय अपेक्षा करायची ? राज्यातील शेतकऱ्यांचा आता सरकारवर विश्वास राहिलेला नाही. सरकार फक्त मोठमोठ्या घोषणा करीत आहे. याकरिता आज आम्ही प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची विनंती केलेली आहे. या विषयावर तत्काळ चर्चा सुरु झाली पाहिजे, ही आमची या निमित्ताने मागणी आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडलेला आहे. महाराष्ट्रातील ज्या इमारतीतून या राज्यातील 12 कोटी जनतेला न्याय मिळण्याची अपेक्षा असते. त्या मंत्रालयाची सर्व दारे बंद झाली, सर्व प्रयत्न थकले आणि त्यानंतर हताश होऊन महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील एक शेतकरी मंत्रालयाच्या पायऱ्यांवर विष प्राशन करतो. हा प्रश्न आता राजकीय राहिलेला नाही. या बाजूच्या किंवा त्या बाजूच्यांचा हा प्रश्न राहिलेला नाही. संवेदना असणाऱ्या सरकारला या संदर्भात किती संवेदना आहे, या प्रश्नावर हे सर्व केंद्रित होऊ लागले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री. रामदास कदम हे औरंगाबादला जाऊन सांगतात की, सर्व पक्षांना विचारात घेऊन आम्ही या दुष्काळाशी लढाई करु आपल्याला सर्वांना विश्वासात घेतले पाहिजे ही भूमिका राज्यातील एक प्रमुख मंत्री मांडतात आणि दुसऱ्या बाजूला राज्याचे मुख्यमंत्री महोदय मागच्या 15 वर्षात काय काय झाले, भ्रष्टाचार झाला या सर्व प्रश्नांचा उहापोह करुन या दुष्काळाच्या प्रश्नावरुन लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करतात. प्रश्न असा आहे की, कदम नावाचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शेतकरी सर्व स्तरावरचे प्रयत्न संपल्यानंतर मंत्रालयाच्या दारात आल्यावर त्याला मंत्रालयाची दारेही आपल्याला न्याय देण्यासाठी बंद झालेली आहेत, ज्या मंत्रालयाकडून महाराष्ट्रातील 12

...3/-



श्री. जयंत पाटील ....

कोटी जनतेच्या न्यायाच्या अपेक्षा असतात त्या मंत्रालयाचे दार बंद झाल्यामुळे त्या कदमने आपल्या दारात येऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. माझ्या सारख्याला या ठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, मंत्रालयावरचा आणि मंत्रालयात बसलेल्यांच्यावरचा लोकांचा विश्वास उडालेला आहे. लोक हताश झालेली आहेत. आपल्या सरकारने फार मोठ्या घोषणा केलेल्या आहेत, हे मलाही मान्य आहे. परंतु, त्या लोकांपर्यंत कशा पोहोचत नाहीत, त्याचे हे प्रतिक आहे. कदम यांच्या आत्महत्येचे हे सर्वात मोठे कारण आहे की, सरकारने केलेल्या घोषणा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास खंडित करुन, थांबवून या प्रश्नावर या सभागृहात चर्चा व्हावी.

अध्यक्ष महोदय, हा पक्षाचा प्रश्न नाही, याकरिता मी या ठिकाणी आपणा सर्वांना आवाहन करतो की, कदम यांनी आत्महत्या केलेली आहे, त्यांना आपण दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करु हा पक्षीय भावनेचा विषय नाही, मी समोरच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणही उभे रहावे आणि कदम हा जरी शेतकरी असला तरी, त्याने केलेल्या आत्महत्येकरिता आपण दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहू.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील या दोघांनीही शेतकऱ्याच्या आत्महत्येबाबतचा विषय मांडलेला आहे. मुळात या संदर्भात सभागृहात दिलेली माहिती वस्तुस्थितीला धरुन नाही.

श्री. ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, ....

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मी मंत्री महोदयांचे बोलणे संपल्यानंतर आपल्याला बोलण्याकरिता संधी देईन.

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ....

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, ज्यांनी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असेल तेच सन्माननीय सदस्य आपले म्हणणे मांडतात. ज्यांचा स्थगन प्रस्ताव असेल त्यांनी तो मांडला पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभागृहाला काही नियम आहेत की नाहीत ? आपण जेव्हा बोलत होता त्यावेळेस आम्ही मध्ये बोललो नव्हतो.

...4/-



श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. ग.आ. देशमुख हे या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य आहेत.

**अध्यक्ष :** मी त्यांना बोलण्याची संधी देणार आहे.

श्री. एकनाथराव खडसे : त्यांच्या खालोखाल आम्ही कनिष्ठ सदस्य आहोत. मी त्यासाठी नाही म्हटलेले नाही. अध्यक्ष महोदयांनी मला बोलण्याकरिता परवानगी दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, यांनी जी माहिती दिली, ती वस्तुस्थिती नाही. माधव कदम यांनी आत्महत्या केली ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, त्याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी हा विषय राजकारणा पलीकडचा असल्याचे सांगितलेले आहे. परंतु, एका बाजूला राजकारणाच्या पलीकडचा विषय आहे असे बोलायचे आणि दुसऱ्या बाजूला राजकारणावर बोलायचे ?

अध्यक्ष महोदय, ज्या माधव कदम यांनी आत्महत्या केली त्यांच्याकडे 1 हेक्टर 9 आर एवढी जमीन आहे. त्यांना 33 टक्क्यांच्यावर नुकसान झाले म्हणून 15 फेब्रुवारी रोजी नुकसानभरपाईची रक्कम देण्यात आलेली आहे. नुकसानभरपाईची रक्कम म्हणून 4600 रुपये त्यांच्या खात्यात 15 फेब्रुवारीलाच देण्यात आलेले आहेत. कापसाची रक्कम देण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यानंतर त्यांना समक्ष भेटून कळविण्यात आले होते की, कापसाचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. हे पैसे देखील ज्या वेळेस राज्य सरकारचा आदेश येईल, त्याप्रमाणे देण्यात येतील. या शेतकऱ्याने यापूर्वीही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला होता.

B-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*(विरोधी पक्षाचे बरेच सदस्य वेलमध्ये असतात)*

*श्री. एकनाथराव खडसे.....*

*त्यामुळे आपल्याला केवळ राजकारण करायचे असेल, तर करावे. परंतु राज्य सरकारने या शेतकऱ्याला न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक केलेल्या बाबी रेकॉर्डला आहे. आम्ही आवश्यक त्या बाबी केलेल्या आहेत. शासनाने यासंदर्भातील प्रयत्न केलेला आहे.*

*अध्यक्ष महोदय, २ रुपये किलो धान्य आणि ३ रुपये किलो तांदुळ १० दिवसांपूर्वी त्यांच्या घरी मिळालेले आहे. त्यांना धान्य मिळालेले आहे. त्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आलेली आहे. कापसाच्या नुकसानीबाबत सरकारचे आदेश निघालेले आहेत, पैसे आल्यावर आठ दिवसात मिळतील असे देखील त्यांना सांगितले होते. त्यामुळे राज्य सरकारने करावयाच्या आवश्यक बाबी वेळेच्या आत पूर्ण केलेल्या आहेत. दुर्दैवाने हा मृत्यु झाला, त्याची खंत सरकारला आहे. अशा घटना घडू नये म्हणून राज्य सरकार आवश्यक ती सावधगिरी बाळगेल. परंतु आपण याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेतली पाहिजे. तुमच्या काळात अशा शेकडो आत्महत्त्या झाल्या, त्यावेळी तुम्हाला आठवले नाही. शेतकरी एका दिवसामध्ये अस्वस्थ झालेला नाही. मागच्या सर्व उपक्रमामुळे तो अस्वस्थ झाला. तुमच्या सर्व निर्णयामुळे शेतकऱ्याची आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आम्ही त्यामध्ये सुधारणा करीत आहोत. परंतु तुम्हाला याबाबत केवळ राजकारण करायचे आहे. या राज्यातील जनता तुमच्याकडे पहात आहे. तुम्हाला शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांशी काहीही देणेघेणे नाही. आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी तुम्ही हे करीत आहात.*

*अध्यक्ष महोदय, प्रश्नोत्तराचा तास अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर इतर चर्चा कराव्यात, असे वारंवार सभागृहामध्ये यापूर्वी सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास सुरु ठेवावा, अशी मी विनंती करतो.*

*अध्यक्ष : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.*

*श्री. गणपतराव देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नांदेड जिल्ह्यातील कदम नावाच्या एका शेतकऱ्याने मंत्रालयासमोर आत्महत्त्या केली, त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन त्यावर चर्चा करावी, असा प्रस्ताव मांडलेला असून त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.*



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. गणपतराव देशमुख.....*

*अध्यक्ष महोदय, या पूर्वी एखाद्या कैद्याने आत्महत्त्या केली तर त्यावेळेच्या अध्यक्षांनी त्या आत्महत्त्याच्या बाबतीत सरकारला जबाबदार धरुन त्यावरील स्थगन प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. अशा पद्धतीचे निर्णय पुर्वीच्या माननीय अध्यक्षांनी दिलेले आहेत. हा प्रश्न महत्वाचा आहे. शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. या वर्षी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या जास्त झाल्या असून यावर यापूर्वी चर्चा झालेली आहे...(अडथळा)...मंत्री महोदय आम्ही आपले म्हणणे शांतपणे ऐकून घेतलेले आहे.*

*अध्यक्ष महोदय, आतापर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये, घरामध्ये, गावामध्ये होत होत्या. हा प्रश्न आता सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा राहिलेला नाही. आपल्या गावामध्ये राहून आत्महत्त्या केल्याने हा प्रश्न सुटत नाही असे पाहून शेतकरी आत्महत्त्या करण्यासाठी मंत्रालयापुढे येत आहेत. सरकारने याची गंभीरतेने दखल घेतली नाही, तर कोण दखल घेणार आहे?*

*अध्यक्ष : आपले म्हणणे रेकॉर्डवर आलेले आहे. या विषयावर चर्चा होणार नाही.*

*श्री. गणपतराव देशमुख : मी हा विषय रेकॉर्डवर यावा, म्हणून बोलत नाही. यापूर्वीच्या निर्णयाला अनुसरुन व ही मंत्रालयापुढील पहिलीच घटना असल्यामुळे हा प्रस्ताव मान्य करावा, अशी मी विनंती करतो.*

*श्री. हेमंत पाटील : अध्यक्ष महोदय, कै. माधव कदम हा शेतकरी माझ्या मतदार संघातील होता. तो माझ्या अत्यंत जवळचा कार्यकर्ता होता. त्याचे वय केवळ २४ वर्षे होते. तो माझ्याकडे देखील येऊन गेला होता. त्याने यापूर्वी १५ डिसेंबर रोजी आत्महत्त्येचा प्रयत्न येथे केलेला होता. तो तहसीलदार यांना भेटला होता, जिल्हाधिकारी यांना देखील भेटला होता. आज मला आमदार म्हणून अतिशय लाज वाटत आहे. मला दुर्दैवाने असे नमूद करावेसे वाटते. हा राजकारणाचा विषय नाही. माननीय कृषी मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी या ठिकाणी चार हजार रुपये जाहीर केले. या चार हजार रुपयांमध्ये काय होते. त्यांच्या घरामध्ये गेल्यावर आम्ही रडलो. माझ्या बरोबर सन्माननीय प्रतापराव देखील होते. आपण तुटपुंजी मदत देतो. उद्या आपण एखाद्या तलाठ्याला निलंबित कराल. परंतु या आदर्श गॅलरीमध्ये बसलेल्या आयएएस अधिकाऱ्यांचे काय करणार आहात. यांना जबाबदार धरणार आहात की, नाही. एक लाख रुपये स्क्वेअर फुट किंमत असलेल्या*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. हेमंत पाटील.....*

*भागामध्ये त्यांना घरे दिलेली आहेत. त्यांच्याकडून कुठलीही धोरणे राबवली जात नाही. कुठल्याही प्रकारचे काम करीत नाही. आम्ही यांच्या विरोधात मोर्चे काढले. ते आत्महत्त्येस जबाबदार म्हणून आम्ही हे केले. त्यामुळे जनतेने आम्हाला सत्तेमध्ये बसविले. सत्ताधारी असून देखील अशा प्रकारच्या आत्महत्त्या होत असतील, तर आम्ही जनतेला काय जबाब द्यायचा, याचे आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब मला सत्ताधारी आमदार म्हणून मनापासून लाज वाटत आहे. काल टँकर खाली १३ वर्षाचा मुलगा मारल्या गेला. आपल्याला विनंती आहे की, आपण आपत्तीसाठी ज्या पद्धतीने चार लाख रुपये जाहीर केलेले आहेत, त्याच पद्धतीने टँकर खाली होत असलेले अपघात, विहिरीमध्ये पाणी काढत असताना महिलांचे मृत्यु होतात, त्याकरिता देखील आपण काही तरतूद करावी, अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.*

*अध्यक्ष : हा स्थगन प्रस्तावाचा विषय होत नाही. आत्महत्त्येचा विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसत नाही. त्यामुळे मी या प्रस्तावाला अनुमती नाकारली आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.*

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे*

*जळगांव जिल्ह्यातील यावल येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत आवश्यक वस्तू आणि साहित्याचा पुरवठा न झाल्याबाबत*

*(१) *४८२५९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) जळगांव जिल्ह्यातील यावल येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत १८ शासकीय आश्रमशाळेत ५ हजार ९५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, विद्यार्थ्यांना शिक्षणासह विविध ऋतुंमध्ये आवश्यक वस्तू व साहित्याचा पुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, विद्यार्थ्यांना अद्याप रेनकोट, स्वेटर इत्यादी साहित्य पुरविलेले नाही, हे ही खरे आहे काय,*
*(४) असल्यास, बाब १, २ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, सदर वस्तुंचा पुरवठा तातडीने होण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केली आहे,*
*(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.*
*(२) हे खरे आहे.*
*(३) हे खरे आहे.*
*(४) व (५) आयुक्त, आदिवासी विकास यांनी दि. २०.०६.२०१५ च्या पत्रान्वये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थांना रेनकोट पुरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठा पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणार नसल्याने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता रेनकोट खरेदी न करण्याचा निर्णय घेण्यात आला.*
*शासन निर्णय दि.१०/३/२०१६ नूसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर तीन वर्षातून एकदा वूलन स्वेटर देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात ई-निविदेद्वारे वुलन स्वेटर खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदेतील दराबाबत तक्रारी प्राप्त झ ाल्यामुळे व तोपर्यंत हिवाळा संपला असल्याने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. सदर बाबीसाठी पुन्हा खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.*

*श्री. संजय सावकारे : या विद्यार्थ्यांना वेळेच्या आत रेनकोट आणि ब्लँकेट मिळालेले नाही, हे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. मुळातच ही खरेदी करताना पावसाळ्याच्या तोंडावर निविदा काढण्यात आल्या म्हणून रेनकोट घेता आले नाही. तसाच प्रकार*

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. संजय सावकारे.....*

*ब्लँकेट्सच्या बाबतीत झाला. हे वारंवार घडत आहे. या गरीब विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ त्या विद्यार्थ्यांना होत नाही. अशा प्रकारे ब्लँकेट असो की, रेनकोट असो हे वेळेवर मिळावे, याकरिता शासन कडक पावले उचलणार आहे काय, तसेच उशिरा टेंडर प्रक्रिया राबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये १८ वसतीगृहे आहेत. त्यापैकी १४ वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत आहेत. १५ शाळांमधील सोलर सिस्टम किरकोळ दुरुस्तीच्या अभावामुळे बंद पडलेल्या आहेत. या सोलर सिस्टम कधी चालू करणार आहात. तसेच भाडेतत्वावर घेतलेल्या १४ वसतीगृहांपैकी १० वसतीगृहांचा प्रस्ताव नाशिक आयुक्तालयाकडे पडून आहे. सदरहू प्रस्तावास केव्हा मान्यता देण्यात येणार असून हे वसतीगृहे कधी पूर्ण करणार आहात?*

*श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविले जाणारे साहित्य वेळेवर मिळाले नाही, ही बाब खरी आहे. परंतु यातील प्रक्रियेमध्ये उशिर झाल्यामुळे पावसाळ्यामध्ये रेनकोट आणि स्वेटर देता आली नाही. परंतु अशा प्रकारचा विलंब होऊ नये म्हणून आम्ही आतापासूनच प्रक्रिया सुरु केलेली आहे. या वर्षीचे शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना लागणारे महत्वाचे साहित्य म्हणजेच स्वेटर, पुस्तक, वह्या, रेनकोट वेळेवर मिळाले पाहिजे.*

*अध्यक्ष : मी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.*

*(सभागृहाची बैठक ११.१९ वाजता १० मिनिटांकरिता स्थगित झाली)*

---*---

...C/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**मंत्रालय इमारती समोर एका शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या करणे या विषयावर म.वि.स. नियम 57 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत दिलेली सूचना**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या घटनेचे गांभीर्य मी नम्रपणे शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छित आहे. आत्महत्याग्रस्त व्यक्ती हा सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य श्री.हेमंत पाटील यांच्या मतदार संघातील असून त्यांनी घटनेचे वास्तव आपल्यासमोर सांगितले आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनस्तरावर जी भूमिका घेण्यात येत आहे त्यामुळे शेतकऱ्यांचा शासनावर कोणत्याही प्रकारचा विश्वास राहिला नाही, हे त्याचेच द्योतक आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मागील 2-3 महिन्यांचा किंबहुना शासनाने केलेल्या घोषणांचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की राज्यात रोज किती तरी शेतकरी आत्महत्याकरीत आहेत. याचा अर्थ शासनाच्या सर्व योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत, लोकांचा शासनाच्या योजनांवर विश्वास राहिला नाही. मंत्रालयासमोर एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या करणे ही घटना अतिशय गंभीर आहे. या प्रकरणी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन व्यापक चर्चा करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

यानंतर D-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.......

अध्यक्ष महोदय, कर्जमाफीची ही मागणी आम्हीच करीत नाही तर सभागृहाचे दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य त्यास सहमत आहेत. पण यामधील काही सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही हा प्रश्न आहे. आम्हाला ते खासगीमध्ये येऊन सांगतात की, त्यांना गावामध्ये लोक फिरु देत नाहीत. मतदार संघामध्ये लोक येऊ देत नाहीत. महाराष्ट्र राज्यात पडलेल्या अभूतपूर्व दुष्काळाच्या परिस्थितीमुळे शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर प्रचंड प्रक्षोभ झालेला आहे. आम्ही या सभागृहामध्ये कर्जमाफीची किमान मागणी करीत असताना पण कर्जमाफीची घोषणा करीत नाही. त्यांना श्रध्दांजलीही वाहू देत नाहीत.

**अध्यक्ष :** हा विषय पूर्वी झालेला असल्यामुळे पुन्हा पुन्हा आणू नये.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : मंत्रालयासमोर होणारी ही घटना म्हणजे सरकारला शरमेने मान खाली घालावी लागणारी ही एवढी मोठ्ी वाईट घटना आहे. या सरकारच्या संवेदना जागृत होत नाहीत हे वास्तव आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या प्रती श्रध्दांजली ठराव मांडावा अशी आपल्याला या निमित्ताने विनंती आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, आपण स्वत: शेतकरी आहात. या सभागृहातील दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य शेतकरी आहेत. माझे स्वत:चे स्पष्ट मत आहे आणि हे रेकॉर्डवर सुदा राहील की, हे सभागृह अस्तित्वात आल्यापासून जोपर्यंत पुढे काम करीत राहणार आहे तोपर्यंत या सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे जितक्या वेळा या सभागृहात निवडून आले आहेत आणि जेवढा कालावधी या सभागृहाचे सदस्य राहिले आहेत, तेवढे रेकॉर्ड कोणाचेही होणार नाही, एवढे मोठे काम आज त्यांचे आहे. मी आपल्यावर हेत्वारोप करीत नाही. पण त्यांनी जो मुद्दा मांडला त्यावेळी आपण त्यांना सांगितले की, तुमचे बोलणे रेकॉर्डवर आलेले आहे. पण ते रेकॉर्डवर येण्यासाठी बोलले नव्हते. त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला.

**अध्यक्ष :** मी त्यांना फक्त आपले म्हणणे मांडून झाले आहे असे म्हटले होते.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये लाखाचा पोशिंदा मरतो आहे आणि त्यावर या ठिकाणी अशा पध्दतीची चर्चा होऊ पहात आहे. मधले चार दिवस सुटटी होती. त्यामध्ये कोणी होळी करीत होते. कोणी धुळवड खेळत होते आणि कोणी रंगपंचमी खेळत होते. परंतु या

2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजित पवार.......

ठिकाणी मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत पाटील यांनी जी घटना सांगितली त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. या सभागृहामध्ये एखाद्या सन्माननीय सदस्यांने एखादी गोष्ट सागितल्यानंतर ती खरी मानून त्या संदर्भात आपण चर्चा करतो. परंतु या ठिकाणी एवढा मोठा गंभीर प्रश्न असताना आणि आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून तेथे बसले असताना तरी देखील चर्चा होत नाही आणि त्याला न्याय मिळत नाही.

**अध्यक्ष :** होय, मी शेतकरी आहे. परंतु हा विषय होत नाही.

श्री. अजित पवार : तरी देखील येथे चर्चा होते आणि कोठे तरी आपले म्हणणे रेकॉर्डवर येईल अशाप्रकारे बोलले जाते हे बरोबर नाही.

**अध्यक्ष :** मी त्या हेतूने बोललो नाही. मी हे म्हटले की आपल्याला सर्वांना 2-2, 3-3 मिनिटे दिले पाहिजेत.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, हेत्वारोप नाही. सन्माननीय महसूल मंत्री आपण देखील शेतकरी आहात. या मंत्रिमंडळामध्ये सर्वात जास्त शेतकरी आहेत हे आम्हालाही माहिती आहे. परंतु ज्या पध्दतीने कारभार चालला आहे तो योग्य नाही. नांदेडमध्ये त्याला जिल्हाधिकारी यांनी न्याय दिला नाही. म्हणून तो मंत्रालयामध्ये येतो आहे आणि मंत्रालयात येऊन विष पिऊन आत्महत्या करतो ही कुठली पध्दत आहे. या ठिकाणी सभागृह सुरू आहे आणि असे असताना त्यांनी कुणाला न्याय मागायचा ? आम्ही काय येथे नुसते चर्चा करायला आलो आहे काय ?

**अध्यक्ष :** घटना दुर्दैवी आहे याबद्दल वाद नाही. परंतु नियमाने कामकाज चालले पाहिजे.

श्री. अजित पवार : त्या ठिकाणी नियम 57 अन्वये विषय मांडलेला आहे तर सर्व कामकाज बाजूला ठेऊन यावर चर्चा करण्यात यावी. सरळ सांगतात की, आम्ही कर्जमाफी देणार नाही.

**अध्यक्ष :** या नियमाच्या पुस्तकात नमूद असल्याप्रमाणे हा स्थगन प्रस्तावाचा विषय होत नाही.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, आणखी किती लोकांना आत्महत्या होऊ देणार आहात, सन्माननीय मंत्री श्री. खडसेसाहेब विरोधी पक्षनेता असताना सांगायचे की, 302 चा गुन्हा करा.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार हे हेत्वारोप करीत असून त्यांना या घटनेचे राजकारण करायचे असेल तर करावे. तुम्हाला दुःख

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

वाटते आणि आम्हाला आनंद होतो अशातला प्रकार नाही. सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांच्याविषयी आदरच आहे, त्यांच्याविषयी सन्मानच आहे. सभागृहाच्या अध्यक्षांवर अशा प्रकारे हेत्वारोप करणे योग्य नाही. त्यांचा हेतू आपण म्हणता तसा नव्हता. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे उठल्यावर त्यांना कधीही बोलण्याची संधी दिलेली आहे. अशा रितीने आपण माननीय अध्यक्षांवर हेत्वारोप केल्याबद्दल आपण विधानसभा अध्यक्षांची माफी मागितली पाहिजे. विधानसभेच्या अध्यक्षांबद्दल अशा रितीने बोलणे आपल्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांना शोभण्यासारखे नाही. माननीय अध्यक्षांचा हेतू असा नव्हता. प्रसंग दुर्दैवी आहे, याबद्दल दुमत नाही. अशा घटना घडू नये म्हणून सरकारने वारंवार सांगितले आहे. हा प्रकार म्हणजे राजकारणा पलिकडे काही नाही. सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांच्याविषयी पूर्ण आदर ठेऊन आपणास सांगू इच्छितो की, माननीय अध्यक्षांच्या मनामध्ये अशा प्रकारचा हेतू नव्हता. त्यामुळे आपण ज्येष्ठ सदस्य असताना असे बोलणे योग्य वाटले नाही. मला दुःख वाटले की, आपल्यासारखा माणूस या ठिकाणी असे बोलत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

----------

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

(पुढे सुरु.....

ता.प्र.क्र.48259....

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना मी तीन प्रश्न विचारले आहेत की, रेनकोट आणि स्वेटर विद्यार्थ्यांना मिळाले नसल्यासाठी कोण जबाबदार आहे. ते वेळेवर मिळतील यासाठी शासन काय उपाययोजना करणार, हा माझा पहिला प्रश्न होता. दुसरा प्रश्न असा होता की, 15 शाळांमध्ये सोलर सिस्टीम किरकोळ दुरुस्तीअभावी बंद आहेत तर त्या किती दिवसामध्ये आपण दुरुस्त करणार आहात, आणि जळगांव जिल्ह्यामध्ये जवळपास 18 वसतिगृहे आहेत. त्यापैकी 14 वसतिगृहाच्या इमारती ह्या भाडेतत्वावर घेऊन चालविल्या जातात. 10 वसतिगृहांचा प्रस्ताव नाशिक आयुक्तालयाकडे पडून आहे. त्याला आपण तातडीने मंजूरी देणार आहात काय ? ज्या सैनिकी तुकड्या असतात त्यांना सन 2015-16 चा निर्वाह भत्ता अद्यापी मिळालेला नाही तर तो किती दिवसात देणार आहात ?

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न यावल प्रकल्पापुरता मर्यादित आहे. पण तरी देखील सन्माननीय सदस्यांनी ज्या इतर काही गोष्टी सांगितल्या आहेत, त्या संदर्भात सविस्तर चौकशी करण्यात येईल आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. त्यांनी दुसरा विषय वसतिगृहाच्या बांधकामासंबंधी मांडलेला असून तसा प्रस्ताव आला असेल तर तो ताबडतोब मागवून घेण्यात येईल आणि त्यास टप्प्याटप्प्याने बांधकाम करण्यास प्राधान्य दिलेले आहे. त्यामुळे वसतिगृहाचा विषय मार्गी लावण्यात येईल. तिसरा प्रश्न सोलर सिस्टीमच्या अनुषंगाने विचारण्यात आला असून त्या अनुषंगाने चौकशी समिती नेमलेली आहे. या चौकशीचा अहवाल आल्यानंतर निश्चितपणे त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की दराबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे निविदा रद्द करण्यात आली आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी किमान एक प्रश्न तरी होऊ द्यावा.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, निविदा भरल्यानंतर सर्वात कमी दराची निविदा...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य डॉ. जयप्रकाश मुंदडा कृपया आपण थांबावे, कारण विरोधी पक्षनेत्यांना महत्वाचे बोलायचे आहे. इतर सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

5.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, हा विषय इतका गंभीर आहे, यापूर्वी जेव्हा शिळफाट्याची इमारत दुर्घटना घडली आणि मावळच्या शेतकऱ्यांवर गोळीबार झाला होता, अशा अतिशय तातडीच्या घटनांवर सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे आणि आताची ही घटना सुध्दा तशाच प्रकारे गंभीर आहे. त्यावेळी सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेऊन चर्चा झाली होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्येपेक्षा आणखी कोणती दुसरी गंभीर घटना असू शकते. त्यामुळे या बाबतीत ताबडतोब चर्चा सुरू करावी अशी आमची मागणी आहे.

**अध्यक्ष :** मागच्या आठवड्यात या विषयावर चर्चा झालेली आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, चर्चा झाल्यानंतरही सरकारवर लोकांचा विश्वास नाही. या सरकारकडून शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही म्हणून शेतकरी मंत्रालयासमोर येऊन आत्महत्या करीत आहे. यापेक्षा कोणते दुर्दैव असू शकते.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता असावी म्हणून सरकारने ई-निविदा पध्दत सुरू केली आहे. या ठिकाणी सांगितले आहे की, तक्रारदाराने दराबाबत तक्रार केल्यामुळे ई निविदा रद्द केली आहे. एकदा ई टेंडरिंग झाल्यानंतर आणि ते उघडल्यानंतर ज्याची कमी दराने निविदा आलेली आहे त्याला काम मिळायला पाहिजे. या ठिकाणी एक तर निविदा उघडली नसावी किंवा निव्वळ निविदा उघडण्याअगोदर तक्रारदाराने दराबाबत जर तक्रार केली असेल तर त्या तक्रारदाराला त्या दराबाबतची माहिती कशी मिळाली, हा माझा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे जर ती निविदा उघडली असेल तर त्यामध्ये सर्वात कमी दराची कोणाची निविदा आली होती हे सांगण्यात यावे.

E-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48259 ........

डॉ.जयप्रकाश मुंदडा .......

दुसरा प्रश्न असा की, निविदा उघडली असेल तर त्या निविदेमध्ये सर्वात कमी दराची कोणती निविदा आलेली होती हे सांगितले पाहिजे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, निविदा काढल्यानंतर तक्रारदारांच्या तक्रारी आलेल्या आहेत. याचे कारण असे आहे की, 3 वर्षापूर्वी ज्या निविदा काढल्या होत्या, अशा निवीदेचा दर निश्चित केला होता. त्याच्या आणि आताच्या दरामध्ये जवळ जवळ तीन पटीपेक्षा जास्त ही रक्कम असल्यामुळे या तक्रारी सुरु आहेत. त्यामुळे रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. (अडथळा.....)

-----------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मंत्रालय इमारतीसमोर एका शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या करणे या विषयावर म.वि.स.नियम 57 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत दिलेली सूचना**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या संपूर्ण विषयावर चर्चा होत असताना एवढी मोठी घटना राज्याच्या मंत्रालयासमोर एका शेतकऱ्यांने विष प्राषण करुन आत्महत्या केली. त्या शेतकऱ्याला किमान श्रध्दांजली वाहण्याचा ठराव मांडण्याइतपत संवेदनशिलता सरकारमध्ये शिल्लक असेल तर श्रध्दांजली वाहण्याचा ठराव याठिकाणी मांडावा. सरकारच्या मनात शेतकऱ्यांबद्दलच्या भावना शिल्लक राहिलेल्या दिसत नाहीत.

**अध्यक्ष** : श्रध्दांजली वाहण्याचा ठराव सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाकडून एकत्रित ठराव येत असतो. यावर चर्चा करण्यात यावी.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये निदान शेतकऱ्यांना श्रध्दांजली वाहण्याची सुध्दा संवेदनशिलता सरकारमध्ये राहिलेली नाही. म्हणून या सरकारचा शेतकरीविरोधी भूमिकेचा निषेध करीत आम्ही सभात्याग करीत आहोत.

विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.

---------

..........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शासकिय आश्रमशाळांमध्ये मृत्यूमूखी पडलेल्या मुलांच्या**
**कुटूंबियांना आर्थिक भरपाई देण्याबाबत**

**(2) *48716 श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासकिय आश्रमशाळांमध्ये दोन वर्षांमध्ये सर्पदंश, मलेरिया, टायफॉईड, विषबाधा आदी कारणांनी मृत्युमूखी पडलेल्या 109 मुलांच्या कुटूंबियांचे आर्थिक भरपाईपोटी आदिवासी विभागाकडे 82 लाख रुपये थकल्याचे नुकतेच माहे जानेवारी, 2016 मध्ये`वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गेल्या दोन वर्षांत 109 विद्यार्थ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याचे प्रस्ताव विभागाकडे आले असून बजेटमध्ये तरतूद नसल्याचे कारण देत दोन वर्षांपासून शासकीय आश्रमशाळांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या एकाही विद्यार्थ्यांच्या कुटूंबियाला आर्थिक मदत देण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(4) तद्नुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (1) होय.

सन 2013-14 मधील 26 व सन 2014-15 मधील 90 असे एकुण 116 मयत विदयार्थ्यांच्या पालकांना रु 82.80 लाख सानुग्रह अनुदानापोटी रक्कम वितरीत करणे बाकी आहे.

(2) हे खरे नाही.

गेल्या दोन वर्षात मयत झालेल्या विद्यार्थ्यांपैकी 91 विदयार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(3) व (4) सानुग्रह अनुदान करिता अर्थसंकल्पिय तरतूद योजनेतर लेखाशिर्षाखाली असून त्यासाठी गेल्या दोन वर्षात पुरेशा प्रमाणात तरतूद उपलब्ध न झाल्याने प्रलंबित अनुदानाचा सदर खर्च योजनांतर्गत योजनेमधुन भागविण्याच्या सुचना आयुक्तांना दिलेल्या आहेत.

**अध्यक्ष** : आपला अजून एकच प्रश्न झालेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.जयप्रकाश मुंदडा प्रश्नाला न्याय मिळत नसेल तर अर्धा तास चर्चा टाकण्यात यावी.

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48716.......

श्री.चंद्रकांत सोनवणे : अध्यक्ष महोदय, सर्पदंश, विषबाधा, टायफाईड, मलेरिया अशा विविध आजारांनी ग्रासलेल्या आश्रम शाळेतील विद्यार्थी मृत्यूमुखी पडले. या मृत्यूमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने दिले जाणारे अनुदान अजूनपर्यंत दिले गेलेले नाही. 116 विद्यार्थी.........

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य डॉ.जयप्रकाश मुंदडा आपण खाली बसा. आपल्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही तर अर्धा तास चर्चा टाका. आता मी पुढे गेलेलो आहे आपण कृपया खाली बसावे.

श्री.चंद्रकांत सोनवणे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, अजूनही 82.80 लक्ष अनुदान या विद्यार्थ्यांना दिले गेलेले नाही. एकीकडे आदिवासी बांधवांसाठी सातत्याने प्रयत्न करीत असताना आदिवासी बांधवांच्या मुलांना आर्थिक मदत देत असताना शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. गेल्या दोन वर्षापासून या शिर्षकाखाली अनुदान उपलब्ध असताना सुध्दा आदिवासी बांधवांना दिले गेले नाही. त्याचप्रमाणे सन 2013-2014 व सन 2014-2015 मध्ये मयत विद्यार्थ्यांच्या पालकांना अनुदान देण्यासाठी किती निधी उपलब्ध आहे हे सांगावे. तसेच सन 2016-2017 या आर्थिक वर्षामध्ये अनुदान किती प्रमाणात मंजूर आहे. या घटनेला जे कोणी जबाबदार असतील त्यांची चौकशी करण्यात येईल काय? त्यांची जबाबदारी निश्चित करुन जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येणार आहे काय?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे मृत्यू होतात त्याठिकाणी एका विद्यार्थ्यामागे 75 हजार रुपये अनुदान देतो. ही योजना नॉनप्लॅनमध्ये येत असल्याने थोडासा प्रॉब्लेम होतो. हे सर्व लक्षात घेता यामध्ये 116 विद्यार्थी संख्या होती. यातील 78 विद्यार्थ्यांचे बिल ट्रेझरीमध्ये सादर करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे मृत्यू झालेल्या 14 विद्यार्थ्यांना व तसेच सर्व विद्यार्थ्यांना 31 मार्च, 2016 पर्यंत सर्व अनुदान मिळेल अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, या विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यानंतर आणि हा प्रश्न आल्यानंतर ट्रेझरीमध्ये पैसे टाकले गेलेत. मंत्री महोदय या अधिकाऱ्यांना पाठीशी का घालत आहात, हे अधिकारी कोण आहेत. आपण मागासवर्गीयांचे मंत्री आहात. मागासवर्गीय नेत्यांच्या

........5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48716.......

श्री.गुलाबराव पाटील......

समोर जर मागासवर्गीयांचे पैसे मिळत नसतील तर अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येत नाही. तीन वर्ष या विद्यार्थ्यांना पैसे मिळत नाहीत. सर्पदंश झाल्यानंतर पंचनामे होऊन 3-3 वर्षे पैसे पडून असतील आणि प्रश्न लागला म्हणून ट्रेझरीमध्ये पैसे टाकण्यात आले. जे अधिकारी दोषी आहेत. आयुक्त कार्यालयापासून सर्व दोर्षी आहेत. एकीकडे उत्तर देण्यात येते की, आयुक्तांनी चौकशी केली, पण उत्तरात हे सांगण्यात येत नाही. आयुक्तासहित जे जबाबदार अधिकारी आहेत. जे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत सोनावणे यांनी सांगितले त्याप्रमाणे या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय? जेणेकरुन सर्पदंश झाल्यानंतर तातडीने मदत मिळेल.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, अशा प्रकारचा मृत्यू झाल्यास तातडीने कारवाई करण्यात येत आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे अशाप्रकारचा हलगर्जीपणा अधिकारी करीत असतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. प्रश्न अनुदान देण्याचा आहे. ज्या अधिकाऱ्यांनी वेळेवर अशाप्रकारची माहिती दिली नसेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करु. 78 विद्यार्थ्यांचे बील ट्रेझरीमध्ये टाकलेले आहे ते दिनांक 31 मार्च, 2016 पर्यंत मिळणार आहे. याशिवाय ज्या 14 विद्यार्थ्यांचे देणे बाकी आहे, विद्यार्थ्यांच्या कुटूंबियांचे देणे बाकी आहे ते सुध्दा दिनांक 31 मार्च, 2016 पर्यंत देण्यात येईल. यापुढे वेळेवर अनुदान देण्यात येईल अशाप्रकारची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.राजाभाऊ वाजे : अध्यक्ष महोदय, आतापर्यंत 90 जणांना अनुदान मिळालेले आहे आणि 25 जणांचे अनुदान बाकी आहे याबाबत माहिती देण्यात यावी. दुसरा प्रश्न असा आहे की, अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून काय उपाययोजना केलेल्या आहेत.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून इन्श्योरन्स पॉलिसीबाबत सरकार विचार करीत आहे. साधारणपणे 5 ते 6 आश्रमशाळांना मोबाईल व्हॅन देऊन वेळेवर त्यांची तपासणी करणे, आजारी पडल्यास वेळेवर औषधोपचार करणे अशा सुविधा देण्याचा विचार करण्यात येत आहे. 108 ॲब्युलन्स देण्याचा प्रयत्न करीत आहोत. जेणेकरुन मृत्यूची संख्या

........6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48716.......

श्री.विष्णू सवरा.....

कमी होईल आणि त्याचप्रमाणे दरवर्षी आश्रम शाळांमध्ये जे मृत्यू होतात त्या मृत्यूचे प्रमाण कमी व्हावे याची सुध्दा व्यवस्था करण्यात येईल.

श्री.संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, पहिल्या प्रश्नातही पाहिले की, ज्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासींचा पैसा होता त्या विद्यार्थ्यांना सोयी मिळाल्या नाहीत. ब्लँकेट मिळाले नाही, रेनकोट मिळाले नाही आणि पैसा असाच वाया गेला. विद्यार्थी मरण पावल्यानंतर त्यांना 3-3 वर्षे पैसे मिळत नाहीत. सैनिकी आश्रम शाळांच्या तुकड्यांचा निर्वाह भत्ता दिला जात नाही. सदर पेसा अखर्चिक राहिल्यामुळे परत जातो. तरी या आदिवासींचा पैसा त्यांना उपयोगी पडत नाही तर अशा अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येत नाही. संबंधित अधिकारी हा पैसा वितरीत करीत नसतील तर जबाबदार कोणाला धरायचे? माझी मंत्री महोदयांना एकच विनंती आहे की, जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करा. म्हणून या सभागृहाला मंत्री महोदयांनी आश्वासित करावे की, आदिवासींचा पैसा त्यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी अधिकारी हलगर्जीपणा करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे सभागृहात सांगण्यात यावे.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, कुठल्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा विषय नाही. ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला असेल त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. हा नॉनप्लॅनचा विषय असल्यामुळे थोडे ॲजेक्स करायला वेळ जात आहे.

F-1..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48716.......

**अध्यक्ष :** माननीय मंत्री महोदय, शासनाकडून स्थानिक स्तरावर तुमचा निधी गेल्यानंतर तीन महिन्यांच्या आत तो वाटप केला जाईल का ? किंवा तो करण्याची आपण सक्ती केली पाहिजे.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, या संदर्भामध्ये आपण ज्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे केले जाईल. अशा प्रकारचा मृत्यू झाला तर त्याला ताबडतोब 8 ते 15 दिवसांमध्ये निधी दिला पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था आहे.

**अध्यक्ष :** इतर निधीचे सुध्दा तीन महिन्याच्या आत वाटप झाले पाहिजे असा नियम करावा.

श्री.विष्णू सवर : इतर निधी बाबत सुध्दा तशाच प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

श्री.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आपण अतिशय योग्य प्रश्न विचारलात की, तीन महिन्यात निधी वितरीत होईल का ? परंतु प्रश्न तो नाही आहे. हा विषय सन 2013-14 मध्ये 26, 2014-15 मध्ये 90 असे एकूण 116 विद्यार्थी मयत झालेले आहेत. सन 2013-14 मध्ये 26 मुले मेली. सन 2014-15 मध्ये 90 मध्ये मुले मेली. त्यांचे सानुग्रह अनुदाना पोटी रूपये 82 लाख 80 हजार वितरीत करणे शिल्लक आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, या सन 2013-14, सन 2014-2015 मध्ये जर 116 मुले मेली तर हलगर्जीपणा झाला असेल असा प्रश्न कुठे येतो. झाला असेल तर असा प्रश्न येत नाही. या सभागृहातून न्यायाची भूमीका केली पाहिजे. या 116 मुलांची सानुग्रहाची रक्कम अजूनही बाकी आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, यांनी गुन्हा केला आहे. त्या अधिका-यावर काय कारवाई करणार ? आणि हुमन राईट कमिशनला सुध्दा याबाबतची तक्रार देणार का ? याचे स्पष्ट उत्तर दिले पाहिजे.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, अशा प्रकारच्या अधिका-यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, माननीय आदिवासी मंत्री सांगता आहेत की, पैसा देण्यामध्ये विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे. ज्या-ज्या अधिका-यांनी विलंब केला असेल, जे याला कारणीभूत असतील, हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भात खात्री केली जाईल. जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर निलंबनाच्या कारवाई करुन सभागृहाला अवगत करण्यात येईल.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***हिंगोली येथे रेल्वे उड्डाणपुल बांधण्याकरिता राज्य शासनाने ५० टक्के रक्कमेची तरतूद करण्याबाबत***

*(३) * ४६३४६ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण)ण:ण सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) हिंगोली येथे रेल्वे उड्डाणपुल बांधण्याकरिता राज्य शासनाने ५० टक्के रक्कमेची तरतूद करण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव मुख्य पुल अभियंता, केंद्रीय रेल्वे मंत्रालय यांनी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी पाठविला आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, उक्त प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली आहे काय,*
*(३) असल्यास, यासाठी ५० टक्के निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,*
*(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. चंद्रकांत पाटील : (१) प्रस्तुत प्रकरण मुख्य अभियंता, पूल दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद यांचे दिनांक २८.८.२०१५ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.*
*(२), (३) व (४) प्रश्नांकित रेल्वे उड्डाण पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.*

-----------------

डॉ.संतोष टारफे : अध्यक्ष महोदय, दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद यांनी दिनांक 28.8.2015 रोजी एक पत्र महाराष्ट्र शासनाला पाठविले. उत्तरामध्ये मंत्रीमहोदयांनी असे उत्तर दिले की, हिंगोलीचा रेल्वे पुल उड्डाणपुलाच्या बांधकामाचे निकष मंजूरी आणि निधी उपलब्धतेच्या अधिन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील असे गोलमाल उत्तर दिले. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, हिंगोलीतील उड्डाणपुल हा पूर्ण ट्राफिकचे सेन्सेस पूर्ण करतो. आणि हिंगोलीच्या लगत असल्यामुळे नेहमी रेल्वेच्या फे-या चालू राहतात. त्यामुळे नेहमी तेथे ट्रॅफिक जाम होत राहते. बरेच लोक तिथे वेळ लागतो म्हणून सिग्नल पडलेला असून सुध्दा त्या रेल्वे पटरीवरुन क्रॉस करण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे तेथे नेहमी अपघात होणे, ट्राफिक जाम होणे, नेहमी भांडणे होणे असे प्रकार तेथे होत असतात म्हणून माझी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, शासनामार्फत देणारा 50 टक्के निधी आपण या रेल्वे उड्डाणपुलासाठी कधी देणार ?

श्री.प्रविण पोटे पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.संतोष टारफे यांनी प्रश्नामध्ये जो उल्लेख केला तो अतिशय बरोबर आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, 1 लाख टी.यू.व्ही. पेक्षा जास्त ट्राफिक असेल तर अर्धे रेल्वे विभाग पैसे देते आणि अर्धे महाराष्ट्र

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ता.प्र.क्र.४६३४६....*

शासन पैसे देते. त्यानुसार आपण स्पष्ट उल्लेख केला की, 28.8.2015 रोजी पत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे जी.ए.डी.कडे जनरल अरेंजमेन्ट ड्रॉईंग याची सुरुवात सुध्दा झालेली आहे. हे अगदी बरोबर आहे की, निधीच्या प्रमाणामध्ये त्याचा विचार केला जातो. त्या दृष्टीने कामाची सुरुवात करतो.

डॉ.संतोष टारफे : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना विनंती केली होती की, उड्डाणपुलासाठी 50 टक्के निधी द्यायचा तो कधी देणार ? शासनाने पैसा उपलब्ध करुन दिला तर रेल्वे त्यांच्या बजेटमध्ये तरतूद करील. त्यानंतर कामाला केव्हा सुरुवात होईल ?

श्री.प्रविण पोटे पाटील : अध्यक्ष महोदय, ज्या दिवशी ड्रॉईंग फायनल होईल व येणा-या अधिवेशामध्ये ड्रॉईंग व सगळया गोष्टींची तपासणी करुन घेतल्यानंतर निर्णय घेता येईल.

.......

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*राज्यातील आदिवासी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या*
*डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजनेबाबत*

*(४) *५२०६० श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. विलास तरे (बोईसर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राज्य शासनाने भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यामध्ये सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, विशेषत: आदिवासी जिल्ह्याकरीताच असलेल्या या योजनेची प्रमुख वैशिष्टे काय आहेत,*
*(३) सदरहू योजने करिता अर्थसंकल्पात किती तरतुद करण्यात आली आहे,*
*(४) उपरोक्त योजना केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे ?*

*श्री. विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.*
*(२) अ) अनुसूचित क्षेत्रातील कुषोषणाचे व कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी या योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत व स्तनदा मातांना बाळंतपणानंतर पहिल्या तिमाहीत सहा महिन्यांच्या कालावधीकरीता एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो.*
*ब) सदर योजना अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १६ जिल्ह्यांमधील ६९६२ गावांसाठी अनुज्ञेय आहे.*
*क) आहारामध्ये चपाती/भाकरी, भात, डाळ, हिदवी पालेभाजी, शेंगदाणा लाडू व अंडी अथवा पर्यायी घटक समाविष्ट असून सोमवार ते शनिवार देण्यात येणारा आहार निश्चित करण्यात आला आहे.*
*ड)डप्रती लाभार्थी प्रती दिन आहाराचा सरासरी खर्च रु. २५/- एवढा असून आहाराचा दर्जा, किंमत व पोषण मुल्ये सुध्दा विहित केली आहेत.*
*इ) एका अंगणवाडीकरीता एक अशी चार सदस्यीय आहार समिती नियुक्त करुन आहार घटक खरेदी करण्याचे अधिकार आहार समितीस देण्यात आले आहेत.*
*(३) सदरहू योजनेकरिता अर्थसंकल्पात रु. ४८.६७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.*
*(४) सदर योजनेची अंमलबजावणी दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ पासुन करण्यात आली आहे.*

....................

डॉ.संतोष टारफे : अध्यक्ष महोदय, शासनाने भारत रत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजना राज्यातील 16 आदिवासी जिल्हयांसाठी ही योजना राबविलेली आहे. खरोखरच ही योजना खूप चांगली आहे.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, प्रश्न क्रमांक 4 च्या उत्तराला दुरूस्ती सूचवित आहे. त्यामधील उत्तर क्रमांक (3) मध्ये सदरहू योजनेकरिता अर्थसंकल्पात रू. 48.67 कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. असे उत्तर त्यातील रू. 48.67 कोटी छापलेले आहे ऐवजी रू. 67.92 कोटी असे वाचावे.

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 52060......

डॉ.संतोष टारफे : अध्यक्ष महोदय, ज्या गर्भवती महिलांच्या शेवटच्या तीन महिन्यात व स्तनदा माता यांना पहिल्या तीन महिन्यात त्या योजनेचा लाभ होतो. आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, हिंगोली जिल्हयामध्ये भरपूर आदिवासी समाज आहे. परंतु ही योजना तेथे भरपूर आदिवासी समाज असून लागू झालेली नाही. ज्या जिल्हयामध्ये ही योजना लागू झालेली नाही व जेथे 100 टक्के आदिवासी गावे आहेत, अशा जिल्हयामध्ये ही योजना राबविणार का ?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, साधारणपणे आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये सर्व ठिकाणी राबवावी अशा प्रकारची शासनाची कल्पना आहे. त्यामुळे हिंगोली जिल्हयामध्ये का राबविली नाही ? याची चौकशी करु आणि त्या ठिकाणी सुध्दा योजना राबविण्यासाठी तशा प्रकारच्या सूचना देऊ.

श्री.धनाजी अहिरे : अध्यक्ष महोदय, उत्तर देताना एका वेळच्या आहाराचा सरासरी खर्च रुपये 25/- आहे असे म्हटले आहे. मी प्रत्यक्ष या योजनेचा दोन चार ठिकाणी कार्यक्रम अटेंड केलेला आहे. 25/- रुपये हे एका वेळच्या आहारासाठी खूप कमी आहेत. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, ही रक्कम वाढविण्यात देणार आहे का ?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, ही योजना चालू करताना दोन राज्यांचा अभ्यास दौरा केलेला आहे. आंद्रमध्ये ही योजना चालू आहे. तेलंगणा राज्यात ही योजना चालू आहे. त्या ठिकाणी या योजनेला ते 21खर्च करीत आहेत. आपण त्यामध्ये आणखी वाढ करुन 25/- रुपये केलेले आहे. एका वेळचे आपण भोजने देणार आहोत. त्यामुळे त्या रक्कमेत आणखी वाढ करण्याची आवश्यकता नाही.

.......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मनोर ते तलासरी उड्डाणपूल बांधण्याबाबत*

*(५) * ५०३४२ श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) मुंबई-अहमदाबाद महामार्ग (रा.मा.क्र.८) वर मनोर ते तलासरी उड्डाणपूलाअभावी दहा वर्षात सुमारे २८७ जणांचे बळी गेलेले असून सदर महामार्ग धोकादायक बनत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,*
*(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अपघात प्रवण स्थळी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री.प्रविण पोटे पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्ग क्र.८ च्या सुरत ते विरार (कि.मी. २६३/००० ते कि.मी. ५०२/०००) या २३९ कि.मी. च्या सहापदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सुरु आहे. प्रश्नांकित लांबीमध्ये (मनोर ते तलासरी) सन २००६ ते २०१५ या दहा वर्षामध्ये झालेल्या अपघातात ३४० जणांचा मृत्यु झाला आहे. तथापि, सदरचे अपघात वाहनचालकांचा निष्काळजीपणा व चुकींमुळे झाले असल्याचे निदर्शनास आले असल्याचे पोलीस उप अधिक्षक (गृह), पालघर यांनी कळविले` आहे.*

*मनोर ते तलासरी कि.मी. ४४१/४६० ते कि.मी. ३९४/४०० ह्या ४७.०६० कि.मी. महामार्गावर मंजूर वावाप्रमाणे तलासरी, चिल्हारफाटा व मस्तान नाका ह्या तीन ठिकाणी उड्डाणपुल; ठक्कर बाप्पा हायस्कूल येथे हलक्या वाहनांसाठी भुयारी मार्ग व इतर १० ठिकाणी पादचारी भुयारी मार्ग बांधण्यात आले असून चारोटी येथील उड्डाणपुलाचे काम स्थानिक जनतेच्या विरोधामुळे प्रलंबित होते. सदर काम फेब्रुवारी, २०१६ मध्ये सुरु केले आहे.` तसेच धानिवरी येथे मंजूर वावाच्या अतिरिक्त पादचारी भुयारी मार्ग बांधण्यात आला आहे.*

*तसेच पोलीसांच्या मदतीने अनधिकृत क्रॉसिंग वेळोवेळी बंद करणे आणि इशारा फलक, रम्बलर स्ट्रीप्स व ब्लिंकर्स लावण्यात आले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सूरत यांनी कळविले आहे.*

अध्यक्ष : प्रश्नोत्तराचा तास संपला.

G-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** सदस्यांची अटक व सुटकेसंबंधी घोषणा

**अध्यक्ष** : मला पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.सुरेशभाऊ नारायण लाड यांना दिनांक 19.3.2016 रोजी मुंबई पोलीस अधिनिय, 1951 च्या कलम 69 अन्वये खालापूर पोलीस स्टेशन, जिल्हा रायगड येथे 11.55 वाजता ताब्यात घेऊन त्यांना त्याच दिवशी लगेचच मुक्त करण्यात आले.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय देशमुख (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन 2014-2015 या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----

श्री.विजय शिवतारे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेच्या सन 2015 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक 7 डिसेंबर, 2015 ते 23 डिसेंबर, 2015 या कालावधीत माननीय मंत्री / माननीय राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण 658 आश्वासनांची यादी तसेच सन 2015 चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 472 आश्वासनांच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : विधानसभेच्या सन 2015 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक 7 डिसेंबर, 2015 ते 23 डिसेंबर, 2015 या कालावधीत माननीय मंत्री / माननीय राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण 658 आश्वासनांची यादी तसेच सन 2015 चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 472 आश्वासनांच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

-----

श्री.प्रविण पोटे पाटील (उद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

-----

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (उर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन 2014-2015 या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.** : स्थगन प्रस्तावाची/च्या सूचना

**अध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी "खोफडी, ता.बार्शी टाकळी, जि.अकोला येथील धम्मपरिषदेत प्रवचन करणारे ज्येष्ठ साहित्यीक व धम्मपरिषदेतील उपासक व उपासिकांवर दिनांक 22 मार्च, 2016 रोजी अज्ञात व्यक्तींनी केलेल्या हल्ल्यात 25 जण गंभीररित्या जखमी होणे" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने वस्तुस्थितीदर्शक निवेदन करावे असे निदेश देऊन मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. उर्वरित स्थगन प्रस्ताव मी दालनात नाकारलेले आहेत.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आज सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीचा मुद्दा उपस्थित झाला होता, त्याच वेळी आम्ही हा मुद्दा मांडणार होतो.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारचा जलजागृती सप्ताह झाला. या निमित्ताने राज्याला नव्हे तर देशाला काळीमा फासणारी घटना घडली आहे. महाडला चवदार तळयाच्या सत्याग्रहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. आपण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती साजरी करीत आहोत. या घटनेला याकरिता महत्व आहे की, दिनांक 20 मार्च, 1927 रोजी मोठा सत्याग्रह करुन अश्पृश्यांना येथून पाणी घेण्यास परवानगी, संधी व न्याय दिला होता. या निमित्ताने राज्य सरकारने जल सप्ताह जाहीर केलेला आहे. हा सप्ताह नद्यांवर करायला पाहिजे होता किंवा जलयुक्त का झोलयुक्त शिवारामध्ये करायला पाहिजे होता. हा शासनाचा जाहीर कार्यकम होता. जाणीवपूर्वक या कार्यक्रमाची व्युहरचना केली गेली. लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्यामार्फत गुपचूपपणे हा कार्यक्रम करण्याचा प्रयत्न का झाला ? हा शासकीय कार्यक्रम असताना ब्राम्हण, पुरोहितांना घेऊन जलपुजनाचा कार्यक्रम केला गेला. ते जलपुजन होते की शुध्दीकरण होते, येथे मोठा अवमान केला जात आहे. राज्य सरकारकडून नद्यांच्या जलपुजनाच्या कार्यक्रमात तुम्ही चवदार तळयाची निवड का केली हा खरा गंभीर प्रश्न आहे. म्हणून शासनाच्या हेतुबद्दल शंका

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

आहे. आमदारांना व अधिकाऱ्यांना ही बाब माहिती नव्हती का, चवदार तळयाचा इतिहास काय आहे, चवदार तळयाची आपण का निवड केली ? तुम्ही समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन हा शासकीय कार्यक्रम करणे अपेक्षीत असताना ब्राम्हण व पुरोहितांना घेऊन तेथे पुजा का करण्यात आली ? येथे चवदार तळयाचा इतिहास सांगायचा म्हटले तर बराच वेळ जाईल. परंतु निश्चितपणे राष्ट्रपुरुष महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा या निमित्ताने अवमान झालेला आहे. संपूर्ण दलित चळवळीचा व दलित समाजाचा अवमान झालेला आहे. यामुळे शासनाने राज्यातील जनतेची माफी मागितली पाहिजे. मागील 89 वर्षे या इतिहासाला साक्षीदार आहेत. मी इतिहासाचे फार दाखले देणार नाही. मराठवाडा नामांतराच्या वेळी काय घडले, कोणी काय घोषणा दिल्या हे मी सांगणार नाही. भिमशक्ती व शिवशक्तीच्या घोषणा देणाऱ्या लोकांकडून आज बाबासाहेबांच्या विचाराची पायमल्ली व अवमान होत आहे याबाबत शासनाने जागे होऊन माफी मागावी.

अध्यक्ष महोदय, अकोला जिल्हयात धम्मपरिषदेत प्रवचन करणाऱ्या लोकांवर लाठीचार्ज होतो. त्यांना समाजकंटक हाणामारी करतात. पोलीस त्यांचा गुन्हा दाखल करुन घेत नाही. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात कोणती घटना घडली. तेथे कोण गेले, काय भाषण केले त्यापेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू व आंबेडकरी विचारांचे कार्यकर्ते जाब विचारत आहेत की, कोणाच्या परवानगीने तुम्ही येथे सभा घेत आहात. त्यांना धमकावले जात आहे. जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. जय भीम हा नारा ज्या कार्यकर्त्यांनी दिला, मनुवादी वृत्तीचा निषेध केला त्या विद्यार्थ्यांच्या विरोधात फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य देशद्रोहाचा गुन्हा दाखल करतात. यामुळे या देशातील सर्वांचा माना शरमेने खाली जातील. सरकारची नितिमत्ता, नितिमुल्य आज संशयाच्या भोवऱ्यामध्ये आज आहे. एका बाजूला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आपण उद्‌घोष करायचा व जयभीम घोषणा देणाऱ्या लोकांच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावयाचा अशी घटना महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही घडली नाही. राज्याच्या दृष्टीने हा दिवस काळाकुट्ट होता. या सर्व प्रकारांचा विचार करता राज्य सरकारने राज्यातील नव्हे तर देशातील जनतेची माफी मागावी ही आमची मागणी आहे.

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे 125 वे वर्ष चालू आहे. सवर्ण, दलित, इतर मागासवर्गीय अशा प्रत्येकाच्या भारतीयाच्या मनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांविषयी प्रचंड अभिमान व गर्व आहे.

यानंतर एच-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जितेंद्र आव्हाड.....

भारतातील प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकराबद्दल प्रचंड अभिमान व प्रचंड गर्व आहे. त्या महामानवाने माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी प्राप्त करुन दिली. ज्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळयाचा सत्याग्रह केला, तेव्हा ते पाणी पित असतांना म्हणाले की, " हे पाणी पिऊन मी रामभक्त किंवा देवभक्त होणार नाही. पण या दगडी व्यवस्थेला दाखवायचे आहे की, मी माणूस आहे, तुम्ही जे पाणी पित आहात, ते पाणी पिण्याचा अधिकार मलाही आहे, म्हणून मी ते पाणी पित आहे. अशा प्रकारे सत्याग्रह केलेल्या चवदार तळयातील पाण्याचे जलपूजन केले जात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सत्याग्रहाचा अपमान करुन ते दुषित झालेले तळे आहे, असे मानून जर कोणी त्याची पूजा करणार असेल तर 125 व्या जयंतीमध्ये या सत्याग्रहाचा अपमान केला जात आहे, हे मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. अध्यक्ष महोदय, तुम्ही हसण्यावारी न्या... आमचे काही म्हणणे नाही. परंतु अध्यक्ष महोदय,

**अध्यक्ष :** हसत बिल्कूल नाही. तुमचे जे म्हणणे आहे, त्यावर हसण्याचा प्रश्न नाही. परंतु ते त्यावेळी झालेले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मला येथे माझे विचार मांडू द्यावेत. फर्ग्यूसन कॉलेजमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पणतू जय भीमचा नारा लावल्यानंतर त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जातो. फग्यूर्सन कॉलेजमध्ये रोहित वेमुल्लाचे नारे लागतात. म्हणून जर त्यांना जर कोणी देशद्रोही ठरविणार असेल तर...(अडथळा)... तर त्या प्रिन्सीपॉलला तेथून काढणे महत्त्वाचे आहे.

**अध्यक्ष :** आपले सर्वांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे, आता आपण त्यांचेही म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आवश्यक आहे.

श्री.भरतशेठ गोगावले : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जे वक्तव्य केलेले आहे, त्याबाबत.....(अडथळा)

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाचा हा एक शासकीय कार्यक्रम होता. जल अभियान, जलपूजन, जलजागृती हे या कार्यक्रमाचे भाग आहेत.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भरतशेठ गोगावले.....

जलसंपदा विभागाच्या अधिका-यांनी आम्हा लोकप्रतिनिधींना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविले होते. सन्माननीय सदस्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल जो आदर आणि आदरयुक्त भावना व्यक्त केलेली आहे, तीच भावनाआमच्याही मनामध्ये डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आहे. म्हणून आम्ही या तळयाचे व तेथे होणा-या कार्यक्रमामधील संभाव्य घटनांपासून त्याचे रक्षण करीत आहोत. तेथे कोणताही अनुचित प्रकार न घडण्याकरिता हे केले जात आहे. 20 मार्च रोजी होणारा कार्यक्रम व त्या निमित्ताने तेथे येणा-या भीमसैनिकांच्या व्यवस्थेकरिता आम्ही हे काम करीत आहोत. कोणाच्या ध्यानी मनी नाही. कोणाच्या कानी नाही. हा कार्यक्रम शासनाचा असून आम्हा लोकप्रतिनिधींना तेथे प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविले होते. ज्या चवदार तळयाच्या जलांचे पावित्र्य राखण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रहाच्या माध्यमातून केले होते, त्याच पाण्याचे आम्ही पूजन केले. आम्ही त्या पाण्याचे जल शुध्दीकरण केलेले नाही. या कार्यक्रमाचा हा फुकट विपर्यास करुन त्यामुळे नाहक महाराष्ट्राचे लक्ष विचलित करण्याचे काम ही मंडळी करीत आहेत. तसेच, दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम ही मंडळी करीत आहेत. जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.काळोखे, कार्यकारी अभियंता, डेप्युटी इंजिनियर, सर्व ज्युनियर इंजिनियर या सर्व मंडळींनी हा कार्यक्रम आयोजित केलेला होता. ..(अडथळा)... ते सर्व सभागृह आणि आम्ही बघू तुम्ही नका सांगू, आम्हाला त्याचा अभिमान आहे. ..(अडथळा )....किती वेळा हे चवदार तळयावर आले ? ते विचारा ! हा कार्यक्रम 19 तारखेला झाला. चवदार तळयाच्या सत्याग्रहाचा कार्यक्रम 20 तारखेला म्हणजे दुस-या दिवशी झाला होता. सोशल मिडियावाल्यांनी हे व्हायरल केले की, 22 तारखेला हा कार्यक्रम केला. हा कार्यक्रम 19 तारखेला शासनाच्या वतीने पार पाडला गेला होता. आमची मागणी आहे की, ज्याने हा चुकीचा संदेश पोहोचविलेला आहे, त्याची गांभीर्याने दखल घेऊन त्याच्या विरुध्द रितसर गुन्हा दाखल करुन आम्हाला न्याय द्यावा. तसेच, आमची ही अशा प्रकारची बदनामी थांबली पाहिजे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, याबाबत सरकार चौकशी करेल. चुकीचा संदेश पोहोचवून राज्यामध्ये अशा पध्दतीने वातावरण बिघडविण्याचे कोणी कृत्य करीत असेल तर त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. ...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी याबाबत स्पष्टीकरणे दिलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला हा चवदार तळयाचा लढा कशाचा होता ?पहिले ते समजून घेतले पाहिजे. पूर्वी या चवदार तळयावर गुरे, जनावरे, पाणी पिऊ शकत होते परंतु माणूस पाणी पिऊ शकत नव्हता म्हणून हा लढा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता... (अडथळा) चवदार तळयाचा हा मानवमुक्तीचा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लढला, याची ऐतिहासिक नोंद झालेली आहे. हा एक सामाजिक बांधलिकीचा लढा होता. सत्याचा लढा होता. जलसंपदा विभागाच्या जी.आर.चे बोलत आहेत, त्याबाबत मी बोलत आहे. मंत्री महोदय म्हणत आहेत मी चौकशी करणार, माझी तीच मागणी होती. अध्यक्ष महोदय, हा जलसंपदर विभागाचा जी.आर. आपल्याकडे पाठविते. जी.आर.वाचल्यानंतर सांगा की, तो जी.आर. काय सांगतो ? आणि प्रत्यक्ष तेथे कशा त-हेने जलपूजन केले ? याचे उत्तर द्यावे. जी.आर.मध्ये कुठेही पूजनाचा उल्लेख केलेला नाही. 20 मार्च रोजी तेथे एक मोठा कार्यक्रम असतो. लाखोंच्या संख्येने तेथे अनुयायी येतात. हे त्यांना माहिती होते. मग तरीही पूजन करीत असतांना एकाच धर्माच्या पध्दतीने तेथे पूजन का केले ? जी.आर.मध्ये उल्लेख आहे का ? आपण सांगावे ते की, त्याचा कुठे उल्लेख आहे ? जी.आर.मध्ये याचा कुठेही उल्लेख नाही. जी.आर.मध्ये पाण्याच्या वापराविषयीचा जनजागृतीचा उल्लेख आहे. जीआरमध्ये पाणी वाचविणे आणि जनजागृतीचा उल्लेख आहे. अशी परिस्थती असतांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त अशा तऱ्हेची वागणूक दिली जात आहे, याचा मी निषेध करीत आहे. असे असताना धम्म परिषदेमध्ये ज्या तऱ्हेच्या घटना घडतात, त्या शोभनीय नाहीत. फर्ग्यूसन कॉलेजमध्ये जयभीम चा नारा दिल्यानंतर देशद्रोहाचा आरोप लावला जात आहे, हे योग्य नाही. अशा परिस्थितीत उपायुक्त सांगतात की, असे काही झालेच नाही. देशद्रोहाचे नारे व तत्सम काही घटना घडलीच नाही. असे असेल तर पोलीस खरे की, राज्य शासन खरे, हे बघितले पाहिजे. जी.आर.सांगत नसेल तर अशा तऱ्हेचा त्यांनी कार्यक्रम का केला ? ज्या जी.आर.चा वारवांर उल्लेख केलेला आहे, तो जी.आर.व आणखी एक असे दोन्ही जी.आर.मी आपल्याकडे पाठवित आहे.

**अध्यक्ष :** जलपूजन करणे गैर नाही.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, महाडच्या चवदार तळयाच्या येथे जी घटना घडलेली आहे, ती योग्य नाही. असे असताना महाराष्ट्रामध्ये अस्वस्थता कशी वाढत आहे, याचे आणखी उदाहरण फग्यूर्सन कॉलेजमध्ये घडलेले आहे. पुणे येथील फर्ग्यूसन कॉलेजच्या बाहेर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पणतूवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. कारण काय (गोंधळ) त्या ठिकाणी सभागृहाचे सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड गेले होते. त्यांनी तेथे जयभीम घोषणा दिली म्हणून त्यांच्याविरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला गेला होता. त्यानंतर मोठया प्रमाणात काही मुलांनी आक्रमण केले होते. अशा वेळी या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना कोणतेही संरक्षण दिलेले नसताना त्यांच्यावर असा हल्ला होणे योग्य नाही. नाशिक येथे रहाडकर यांच्या मेळाव्यात शिवसैनिकांनी निषेध व्यक्त केला. तेथे त्यांना अटक केली. त्यामुळे त्यांना मोठया प्रमाणात त्रास झाला. ते हा सर्व त्रास सहन करीत आहेत. ते यावर काहीही बोलत नाहीत. शिवसैनिकांना पोलिसांनी ज्या पध्दतीने वागविले त्याच पध्दतीने या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्यावर हल्ला करणा-या दहशत माजविणा-या तरुणांना दहशत माजवून जरबेत बसविण्याचा प्रयत्न करणा-या मुलांवर, गुन्हेगारांवर कोणत्या प्रकारची सरकारने कारवाई केली याचा खुलासा करावा. कोणतीही कार्यवाही सन्माननीय जितेंद्र आव्हाड यांच्यावर चाल करुन गेलेल्या मुलांना अटक केले नाही, त्यांच्यावर गुन्हा नोंदविला तर काही अज्ञातांनी. . . .( अडथळा ) म्हणजे त्यांची नावे माहिती आहेत, समोर कोण होते हेही माहिती होते पण सरकारने त्या ठिकाणी ज्याप्रमाणे जेएनयूमध्ये झालेल्या घटनेबाबबत पडसाद उमटले त्याचप्रमाणे जयभीम म्हणणा-या मुलांमध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. देशद्रोहाची घटना, देशविरोधी घोषणा.....(अडथळा )

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**अध्यक्ष :** आता सन 2016-2017 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस माननीय वित्तमंत्री उत्तर देतील. उत्तर ऐकावयाचे नाही का ? 2-3 दिवस अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा केली त्यावरील उत्तर ऐकणे आवश्यक आहे.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु. शी.** : सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु....

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, शिवाजी महाराजांचे स्मरण करुन या महाराष्ट्राच्या 11,97,00,000 लोकांच्या जीवनामध्ये परिवर्तन व्हावे, हे राज्य देशातच नव्हे तर जगामध्ये आर्थिक संपन्न व्हावे, ही प्रामाणिक भावना घेऊन माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मी दुसरा अर्थसंकल्प हा राज्यातील दीनदुर्बल शोषित-पीडित, अंध-अपंग, निराधार, असहाय्य,दलित, आदिवासी, शेतकरी, शेतमजूराला समर्पित केला. दिनांक 22 मार्च व 23 मार्च रोजी 35 सन्माननीय सदस्यांनी या अर्थसंकल्पाच्या सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेतला होता. सर्वसाधारणत: 524 मिनिटे यावर चर्चा झाली. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील,सर्वश्री.जयंत पाटील, अमित साटम, गुलाबराव पाटील, शरद सोनवणे, प्रा.विरेंद्र जगताप,श्रीमती दीपिका चव्हाण, श्रीमती मेधा कुलकर्णी, सर्वश्री.चंद्रदीप नरके, दत्तात्रय भरणे, राहुल कुल, संग्राम थोपटे, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अबु आजमी, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री सुनील प्रभू, जयदत्त क्षीरसागर,जयकुमार रावल, पृथ्वीराज चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, बच्चू कडू, मंगलप्रभात लोढा, सुरेश गोरे, जयकुमार गोरे, शशिकांत शिंदे, इम्तियाज जलील, संगीता ठोंबरे, सत्यजित पाटील-सरुडकर, श्री.असिफ शेख रशीद, हरीष पिंपळे, अनिल बाबर,

आय-1/---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

श्री. सुधीर मुनगंटीवार......

समीर कुणावार, सन्माननीय सदस्य डॉ. शशिकांत खेडेकर आणि सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक, अशा सर्व वक्त्यांनी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात केली आणि शेवटचे भाषण सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक यांचे झालेले आहे. म्हणजे माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यापासून सुरु झालेल्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा ही 524 मिनिटानंतर सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक अशा शेवटच्या वक्त्यानंतर थांबलेली आहे.

अध्यक्ष महोदय, संत तुकारामाच्या अभंगात असे म्हटले आहे की, घासावा शब्द, तासावा शब्द, बोलावा शब्द, बोलण्यापूर्वी, बोलण्याबरोबर आणि बोलावे खरे.

अध्यक्ष महोदय, काही सन्मननीय सदस्यांनी न वाचल्यासारखे काही प्रश्न उपस्थित केले आहेत. परंतु, काही सन्माननीय सदस्यांनी कोणतीही टीका न करता उत्तम अशा सूचना केलेल्या आहेत, अशा सर्व सन्माननीय सदस्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये काही मौलिक सूचना केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांची यापूर्वीची अर्थसंकल्पावरील भाषणे वाचलेली आहेत. मी त्यांना त्यांचीच सर्व भाषणे भेट म्हणून देणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना राजकारणापासून वेळ मिळाल्यानंतर त्यांनी स्वतः केलेल्या अर्थसंकल्पावरील भाषणे वाचण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक प्रश्नांचे उत्तर हे सव्वा नऊ वर्षे म्हणजे साधारणतः 9 बजेट आणि 1 डिसेंबर, 2000 रोजीच्या बजेटमध्ये उत्तरे मिळणार आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्व भाषणे भेट म्हणून देणार आहे. राज्याचा अर्थमंत्री या नात्याने.....

..........2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

**अध्यक्ष** : माझी विरोधी पक्षातील वेलमध्ये आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

अनेक सन्माननीय सदस्यांनी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या अनुषंगाने भाषणे केलेली आहेत. आता अशा सर्व सन्माननीय सदस्यांनी माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील उत्तराचे भाषण ऐकूण घेण्याची गरज आहे.

सभागृहात गोंधळसदृश्य परिस्थिती असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 22 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर)**

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.राहूल बोंद्रे )**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती असल्यामुळे मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नाही त्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 33 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

-----------

यानंतर L-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी आपले म्हणणे ऐकलेले आहे. मंत्री महोदयांचे उत्तर होऊ द्या.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

**पृ. शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु. शी.** : सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार ( वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, "सब का साथ और महाराष्ट्र का विकास" हे सूत्र घेऊन मी हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या जनतेला सादर केला. अर्थसंकल्प सादर करताना तो केवळ या सरकारचा असता कामा नये, सरकारी अधिकाऱ्यांचा असता कामा नये तर, हा अर्थसंकल्प सामान्य जनतेचा व्हावा ही भावना ठेवून हा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पामध्ये काय असावे ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पात आपण कोणत्या मुद्यांवर भर द्यावा, कोणत्या मुद्यांच्या आधारावर राज्याचा विकास करावा यासाठी जनतेकडून मी सूचना मागितल्या होत्या. या विधानसभेचे 288 आमदार, ते कोणत्या पक्षाचे आहेत, ते किती वेळा निवडून आले आहेत हे महत्त्वाचे नाही तर या विधानसभेचे प्रत्येक आमदार हे माझ्या दृष्टिकोनातून जनतेचे सेवक आहेत. जनतेची सेवा करण्याची इच्छा घेऊन ते या सभागृहात आले आहेत. त्याचे हे कर्तव्य आहे की, जनतेच्या हितासाठी आपले मत, ज्ञान, अनुभव अर्थसंकल्प मांडताना कामी यावा यासाठी त्यांनी अर्थसंकल्पामध्ये सूचना कराव्यात. ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील मी यासाठी सर्वांना पत्र पाठविली. परंतु, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील मला एका गोष्टीची खंत आहे की, तुम्ही मला एकही सकारात्मक सूचना दिली नाही. सरकार नावाच्या संस्थेची व्याख्या काय आहे तर, लोकांनी, लोकांसाठी, लोकांची कोणतीही मदत न घेता चालविण्यात येणारी संस्था म्हणजे

...3/-

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

सरकार. ही व्याख्या बदलवण्याचा मी प्रयत्न केला. एक मुख्यमंत्री, 30 मंत्री, 365 आयएएस अधिकारी, 358 तहसीलदार, 36 जिल्हाधिकारी, 288 विधानसभा सदस्य, 34 जिल्हा परिषद अध्यक्ष, 78 विधानपरिषद सदस्य म्हणजे सरकार नव्हे. याकरिता आपण या सूचना कधी वेबसाईटच्या माध्यमातून मागविल्या तर, कधी माझ्या केबिनच्या बाहेर मी सूचनेकरिता डबा लावला, पत्र पाठविली. मला अभिमान व आनंद आहे की, मी सरकार नावाच्या संस्थेची व्याख्या बदलविण्यामध्ये एक पाऊल पुढे टाकले. 3 हजारच्या वर सूचना आल्या. लोकांनी एका कागदावर अंत:करणापासून सूचना लिहिण्यासाठी, इमेल करण्यासाठी, पोस्टामध्ये लिफाफा टाकण्यासाठी त्यांच्या आयुष्याचा एक क्षण खर्च केला, मी त्यांनाही मनापासून धन्यवाद देतो.

या सभागृहात मला एका गोष्टीचा आनंद आहे की, माननीय विरोधी पक्ष नेते, तसेच दीर्घ अनुभव असलेले व 1 मे, 1960 पासून आजपर्यंत सव्वानऊ बजेट मांडण्याचा ज्यांचा रेकॉर्ड कोणी मोडला नाही ते सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, माननीय माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, माननीय माजी वन मंत्री जे कधीही नकारात्मक भूमिका घेत नाहीत असे सकारात्मक भूमिका घेणारे डॉ. पतंगराव कदम या सर्वांनी काही चांगल्या सूचना केल्या. तसेच, इतर सन्माननीय सदस्यांनीही चांगल्या सूचना केल्या. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण थोडी जास्त टिका केली. परंतु, ती टिका मी आनंदाने घेतो कारण सरकारची दिशा योग्य रहावी, याकरिता ती टिका केली होती. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी चांगली अभ्यासू टिका केली. मी तर ईश्वरचरणी हीच प्रार्थना करतो की, जसे चांगले मित्र असले पाहिजेत तसे चांगले मनापासून टिका करणारे विरोधक असावेत. असे विरोधक आहेत हे मी आमचे भाग्य समजतो. मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो की, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्यासारखे विरोधक 25 वर्षे आम्हाला या सभागृहात दे ईश्वरा आम्ही योग्य दिशेने आमचा प्रवास करु शकू.

अध्यक्ष महोदय, आम्हाला विरासत आणि वारसा काय प्राप्त झाला ? तर आम्हाला वारसा प्राप्त झाला तो म्हणजे राज्याच्या तिजोरीत खडखडाट. आम्हाला वारसा काय मिळाला तर 3 लाख

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

30 हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळाले. आम्हाला वारसा काय मिळाला तर, 27 हजार कोटी रुपयांचे व्याज मिळाले. आम्हाला वारसा काय मिळाला तर 74 हजार कोटी रुपयांचे वेतन मिळाले. आम्हाला वारसा काय मिळाला तर, 30 हजार कोटी रुपयांचे पेन्शन मिळाले. आम्हाला वारसा काय मिळाला तर, सन 2014 मध्ये आलेली 12 हजार कोटी रुपयांची महसुली तूट असा वारसा मिळाला होता. परंतु, मी दोष देणार नाही. हा वारसा आम्हाला ज्यावेळेस गत सरकारकडून प्राप्त झाला, तेव्हा एक गोष्ट मागच्या सरकारकडून आम्हाला प्राप्त झाली ती, म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव, पराक्रम देखील आम्हाला प्राप्त झाला. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. याकरिता मी एक गोष्ट सांगतो की, विरासत, वारसा काही असेल, आर्थिक अडचण, आर्थिक टंचाई असेल तरी,

"तनीक कदमों को बांध ना पाएगी मुसीबत की ये जंजीरे,
रास्तों से जरा कह दो अभी भटका नहीं हूं मै."

अध्यक्ष महोदय, आम्ही हा अर्थसंकल्प मांडला. सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम मी आपल्याला धन्यवाद देईन की, आपण अर्थसंकल्पाला पाठिंबा दिला, समर्थन केले. तुमचे मन मोठे आहे. मी विचार केला की, असे मोठे मन तुम्ही विरोधात असताना कसे दाखवू शकता ? तर याला एकमात्र कारण आहे की, तुम्ही 5 वर्षे वन मंत्री होता.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*(विरोधी पक्षाचे बरेच सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)*

*श्री. सुधीर मुनगंटीवार.....*

*वन मंत्री असताना तुम्ही शुद्ध ऑक्सीजन घेतला. शुद्ध हवा घेतली. शुद्ध आचार, शुद्ध विचार प्राप्त केला आणि म्हणून या अर्थसंकल्पाला पाठिंबा दिला. काही सन्माननीय सदस्यांनी श्री चक्रधर स्वामींच्या दृष्टांतानुसार त्यांना योग्य वाटले ते सांगितले. काही सन्माननीय सदस्यांनी दिशाहीन अर्थसंकल्प असल्याचे सांगितले. काहींनी सांगितले की, अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी तरतूद केलेली २५ हजार कोटी रुपयांची रक्कम धुळफेक असल्याचे तसेच राज्याची दिशाभूल झाल्याचे काहीं सन्माननीय सदस्यांनी सांगितले. म्हणजेच ज्यांना जे जे समजले, ते ते श्री चक्रधर स्वामींच्या दृष्टांतासारखे त्यांनी करण्याचा प्रयत्न केला. मी आपल्याल्या निश्चितपणे एक बाब सांगू शकेल. कोणत्याही राज्याचा विकास किती झाला हे पहायचे असल्यास, जसे एखाद्या विद्यार्थ्याचे मुल्यांकन त्याच्या गुणपत्रिकेवरुन समजते. म्हणजेच त्याच्या फायनल परीक्षेमध्ये त्याने सोडवलेल्या पेपरनंतर येणारी गुणपत्रिका विद्यार्थ्याचे मुल्यांकन असते. अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन हे त्या राज्याचा विकासदर किती आहे, त्यावरुन होत असते.*

*अध्यक्ष महोदय, काही लोकांनी अशी शंका उपस्थित केली की, नवीन सुत्रे केली. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, नवीन सुत्र झाले म्हणून कदाचित विकास दर वाढू शकतो. मी सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांना एकच प्रश्न विचारतो. देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद मोदीजी आहेत. जर नवीन सूत्र घेतले म्हणून महाराष्ट्राचा विकास वाढला असेल तर गुजरातचा विकास दर हा नवीन सुत्रानुसार ७.६ वरुन ६.७ झाला. म्हणजे गुजरातचा विकास दर एक टक्क्याने कमी झाला. याचा अर्थ काय. गुजरातचा विकासदर कमी करुन महाराष्ट्राचा विकास दर वाढला, असे दाखविण्याचा देशाच्या माननीय प्रधानमंत्र्यांचा प्रयत्न आहे काय? बिहारचा विकासदर हा १५.५६ टक्के होता, तो या वर्षी १०.२७ टक्के झाला. म्हणजेच ५.२९ टक्क्याने कमी झाला. बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी बदललेल्या सुत्राच्या संदर्भात आक्षेप घेतला नसता? उत्तर प्रदेशचा विकासदर ६.१ होता तो ६.६ टक्के झाला, म्हणजे केवळ ०.५ टक्क्याने वाढला. त्यांनी आक्षेप घेतला नसता काय? राज्याने विपरित अवस्थेत, आसमानी आपत्ती असताना, पाण्याचा एक, एक थेंब अनमोल होता, अमुल्य होता. पाऊस पडला नाही. आमचा कृषी*



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुधीर मुनगंटीवार.....*

*विकास दर निगेटीव्हमध्ये होता, मागे गेला होता. परंतु मी या सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील उद्योजकांचे अभिनंदन करेल आणि सर्व्हिस सेक्टरमध्ये काम करणाऱ्यांचे अभिनंदन करेल की, त्यांनी कष्ट केले, मेहनत केली आणि अशा विपरीत अवस्थेत सुद्धा आपण आपला विकास दर हा ५.८ टक्क्यावरुन २.२ टक्क्याने वाढवला आणि ८ टक्क्यांवर नेला. जर मी दाव्याने सांगतो की, पाऊस असता तर या देशातील नंबर तीन मध्ये कदाचित आपले राज्य राहिले असते. मध्ये प्रदेश आणि आंध्र प्रदेश पेक्षाही आपण पुढे गेलो असतो.*

*अध्यक्ष महोदय, वस्तुनिर्माण क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीची सर्वात जास्त क्षमता असते.*

*श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही सकाळपासून एक मुद्दा उपस्थित केला होता. तसेच सन्माननीय सदस्या प्रा. वर्षाताई गायकवाड यांनी देखील हा मुद्दा उपस्थित केला. सभागृहामध्ये माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. आपण तो जीआर पहावा.*

*अध्यक्ष : विरोधी पक्षनेते, माननीय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील आपल्याला माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यावर बोलण्याची संधी देण्यात येईल. तसेच आपण विचारलेल्या प्रश्नावर माननीय मंत्र्यांना उत्तर देण्याच्या सूचना करण्यात येईल. कृपया आपण खाली बसावे.*

*(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)*

*श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, वस्तुनिर्माण क्षेत्रात रोजगार निर्मितीची क्षमता असते. ती २०१२-२०१३ पासून सात्यात्याने घसरत होती. परंतु २०१५-२०१६ मध्ये हा दर आपण ६.२ टक्के केला.*

*अध्यक्ष : सन्माननीय सदस्या प्रा. वर्षा गायकवाड यांनी या बाजूला यावे.*

*श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आपल्याला माहीत आहे की, डिसेंबर २०१५ मध्ये ग्रामीण भागातील महागाईचा दर ४.६ टक्क्यावरुन २.६ टक्क्यापर्यंत कमी झाला. नागरी भागासाठी महागाईचा दर ३.७ टक्क्यांपासून ३.५ टक्क्यापर्यंत आला. राज्याच्या कर महसुलात ११.७ टक्क्याने वाढ झाली. वाणिज्यीक बँकांचे अर्थव्यवस्थेमध्ये रक्तवाहिनीसारखे महत्व आहे. २०१४ मध्ये १०,६४४ बँका होत्या. दररोज दोन नवीन राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेची स्थापना महाराष्ट्रात केली आणि बँकांची संख्या ११,२८४ झाली. विशेष शेतकऱ्यांचा कर्ज पुरवठा या दृष्टीकोनातून काम केले. यामध्ये देखील ८.९ टक्के वाढ झाली. आपण गेल्या वर्षभरात प्रयत्नपूर्वक बँकेचे खाते उघडावे*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुधीर मुनगंटीवार.....*

*यासाठी प्रयत्न केला. एकविसाव्या शतकामध्ये संगणकिय प्रणालीचा विकास होत आहे.*

*अध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. विधानसभेचे कामकाज पहाण्यासाठी गॅलरीमध्ये शाळेतील विद्यार्थी बसलेले आहेत. ते आपल्याकडून काय आदर्श घेतील? कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.*

*श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आपण बँकेच्या खात्यामध्ये थेट मदत किंवा अनुदान पाठविण्याचा निर्णय करीत आहोत. त्यामुळे बँकेचे खाते हे महत्वाचे शस्त्र होते. आपण १ कोटी ३५ लाख नवीन खाते उघडण्यामध्ये यशस्वी झालो. दुधाच्या क्षेत्रामध्ये देशात आपले परकॅपिटा कमी आहे. परंतु आपण वर्षभरात ४५.४५ लाख लिटर्स दुधावरुन ५०.५२ लाख लिटर्स पर्यंत गेलो आहे. जेव्हा पाऊस येत नव्हता. चाऱ्याची टंचाई आहे, राज्यामध्ये विपरित अवस्था असताना देखील माननीय कृषी मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांच्या सक्षम नेतृत्वामध्ये आपण दुधामध्ये वाढ करण्यात यशस्वी झालो.*

*अध्यक्ष महोदय, आमचे ऊर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे ऊर्जावान नेता आहेत. आम्ही विजेच्या स्थापीत क्षमतेमध्ये ५.८ टक्क्यांनी वाढ केली. दशलक्ष युनिटमध्ये ८.१ टक्के वाढ केली.*

*अध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्य जागेवर बसल्यानंतर मी आपणास बोलण्याची संधी देतो.*

*श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम मंत्री माननीय श्री. चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) माननीय श्री. एकनाथ शिंदे आहेत. मी आपल्याला अभिमानाने सांगतो की, राज्यामधील रस्त्यांची लांबी २०१३ मध्ये ८.४ टक्क्यांनी वाढली होती. आम्ही रस्त्यांची २०१५ मध्ये माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील व माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली १३.५ टक्क्यांनी वाढविली. असे यशस्वी काम या राज्यसरकारने करुन दाखविले. हे करीत असताना एका गोष्टीची गंभीर जाणीव मी सभागृहाला व सभागृहाच्या माध्यमातून राज्याच्या जनतेला करुन दिली. जेव्हा हा विकास दर वाढला तेव्हा कृषी क्षेत्राचा विकास दर निगेटीव्ह होता. नकारात्मक होता. ही तुमच्या आमच्यासाठी गंभीर बाब आहे. आपण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो. आपण महात्मागांधींचे नाव घेतो. महात्मा गांधी जे म्हणायचे त्यातील महत्वाचा मुद्दा होता. तो*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुधीर मुनगंटीवार.....*

*म्हणजे मुठभर श्रीमंत आणि कोट्यावधीश बुभुक्षित लोक यांच्यामधील अफाट अंतर जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत अहिंसात्मक राज्यपद्धती अशक्य आहे. मुठभर लोक श्रीमंत आणि लाखो भुमातेची सेवा करणारे शेतकरी, कष्टकरी संकटात व अडचणीत. यावर चिंतन करणे आवश्यक होते. त्यामुळे आपण या वर्षीचा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना समर्पित केला. हे वर्ष स्वाभीमानी शेतकरी वर्ष म्हणून आपण साजरा करण्याचा निर्णय केला. जो शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, ज्याला आपण शेतकरी राजा म्हणतो, आपण अन्नदाता सुखी भव म्हणतो. या महाराष्ट्राच्या तिजोरीवर पहिला हक्क कोणाचा असेल तर तो कष्टकरी म्हणजेच कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचा आहे.*

*...M/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.सुधीर मुनगंटीवार.......

या राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क कोणाचा असेल तर तो कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचा आहे व गावातील भूमातेची सेवा करणाऱ्याचा आहे.

अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, कोणताही शेतकरी दया, सहानुभूती मागत नाही. तो..... .....(अडथळा)

**अध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी आपल्या जागेवर बसावे. सर्व सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर बसल्यानंतर मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना बोलण्याची संधी देईन.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहातील.....

**अध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेते यांचे देखील विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य ऐकत नाहीत. कृपया माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सन्माननीय सदस्यांना जागेवर बसण्यासाठी सांगावे. मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना बोलण्यास अनुमती देत आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहातील सन्माननीय सदस्य व राज्यातील संपूर्ण जनतेची भावना आहे की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला श्रध्दांजली अर्पण करण्याबाबतचा मुद्दा मी सकाळपासून सदनामध्ये मांडत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला श्रध्दांजली अर्पण करण्याचा ठराव मांडण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, महाड येथे घडलेली घटना अतिशय गंभीर आहे. अकोल्यामध्ये धम्म प्रचारकावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. "जय भीम" म्हणणाऱ्या लोकांवर, तरुणांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यासंबंधी चर्चा होत आहे. या विषयासंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे. राज्याचे मुख्यमंत्री महोदय सभागृहात येऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करणार का, महाड येथील घटनेबाबत जनतेची माफी मागणार का, "जय भीम" म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याच्या संबंधात संबंधित प्राचार्य यांना निलंबित करण्यात येईल काय ? या प्रकरणी माननीय मुख्यमंत्री यांनी

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला आश्वासन देण्याची आवश्यकता आहे. विरोधी पक्षाची सहकार्य करण्याची तयारी आहे. परंतु राज्यातील संपूर्ण जनतेच्या भावना तीव्र असून त्यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी राज्य सरकारची भूमिका मांडावी, अशी आमची मागणी आहे.

**अध्यक्ष :** माननीय वित्त मंत्री यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, ..... (अडथळा) .........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**अध्यक्ष :** माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता यांना बोलण्यास अनुमती देण्यात येत आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी माननीय विरोधी पक्ष नेते यांनी केली आहे. सन 2016-17 च्या अर्थसंकल्पावर सभागृहामध्ये झालेल्या चर्चेस माननीय वित्त मंत्री उत्तर देत आहेत ...... (अडथळा) .... विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त मंत्री महोदयांचे भाषण दोन वेळा थांबविण्यात आले आहे. सभागृहाला उत्तर देण्याबाबत सरकारची भूमिका सकारात्मक आहे. वित्त मंत्री महोदयांचे भाषण थांबवून मुख्यमंत्री महोदयांचे उत्तर मागणे .......(अडथळा) मुख्यमंत्री महोदय राज्य सरकारची भूमिका स्पष्ट करणार आहेत, असे अगोदरच विरोधी पक्षास सांगण्यात आले आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, महात्मा गांधी असे म्हणाले की, "निष्काम बुध्दीने केलेल्या कार्याचे फळ नेहमीच चांगले असते."

अध्यक्ष महोदय, जे कोणी माझ्या उत्तरास विरोध करीत असतील त्यांच्याकडे लक्ष देऊ नये......

**अध्यक्ष :** माननीय वित्त मंत्री यांनी आपले भाषण थांबवावे. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी आपले म्हणणे एका वाक्यात मांडावे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी व सन्माननीय सदस्यांनी एक अतिशय महत्वाचा मुद्दा सदनामध्ये मांडलेला आहे. आम्हा सर्वांना वित्त मंत्री महोदयांचे उत्तर ऐकावयाचे आहे परंतु त्यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांनी सरकारची भूमिका मांडावी. सदनामध्ये उपस्थित तीन विषयामुळे देशाचे व संपूर्ण राज्यातील वातावरण गढूळ होत आहे.

**अध्यक्ष :** हा मुद्दा सदनामध्ये वारंवार मांडण्यात आला आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, अकोला येथील घटना आणि शेतकऱ्याच्या आत्महत्येसंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सरकारची भूमिका स्पष्ट करावी.

**अध्यक्ष :** विरोधी पक्ष नेते व गट नेते यासर्वांनी हा मुद्दा मांडलेला आहे, वारंवार मांडलेला आहे. या विषयावर बोलण्यासाठी मी आता कोणाला अलाऊ करणार नाही. वित्त मंत्री महोदयांनी आपले भाषण सुरु करावे....... (अडथळा) ....... या विषयासंदर्भात सभागृहाचे कामकाज दोन वेळा तहकूब करण्यात आले होते. मी माननीय गट नेते व माननीय विरोधी पक्ष नेते यांचेशी चर्चा केली असून त्यांना वित्त मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण ऐकून घ्यावे, अशी विनंती केली आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, पक्षातील माणसांनी राजकारण करावे परंतु अशा प्रसन्न .... (अडथळा) .... ज्यावेळी सदनामध्ये शेतकऱ्यांच्या संदर्भात चर्चा करतो ...

अध्यक्ष महोदय, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी "काँग्रेस हे जळते घर आहे" असे का म्हटले होते, याचे उत्तर मला आज सापडले. यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घटनेच्या समितीवर निवडून येऊ दिले नव्हते. कारण यांना जाणीव होती की, हा सूर्य संसदेत आला तर काँग्रेसचे .... (अडथळा) ... झाल्या शिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, आज मी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उत्तर देण्यासाठी उभा राहिलो त्यावेळी मला यांचे खरे रुप दिसून येत आहे. यांना शेतकऱ्यांशी देणे घेणे नाही. फक्त खुर्चीवर यांचे प्रेम आहे. उद्या बजेटमध्ये यांना 10 खुर्च्या घेऊन द्या, हे सभागृहात शेतकऱ्यांची बाजू घेण्यासाठी येणार नाहीत. जन्मापासून मृत्यूपर्यंत यांचे खुर्चीवर प्रेम आहे. विरोधकांनी चांगले विचार मांडले असते तर मी समजू शकलो असतो. काहीही झाले की कर्जमुक्ती....

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार........

अध्यक्ष महोदय, बॉम्बे टू गोवा पिक्चर मी पाहिला. त्यामध्ये एक मुलगा असतो त्याच्या तोंडावरील पट्टी काढली की तो "बाबा पकोडा, बाबा पकोडा" असे म्हणतो. विरोधकांचे सुध्दा बॉम्बे टू गोवा चित्रपटासारखे झाले आहे. विरोधकांनी विषयावर चांगले मुद्दे मांडावेत, चांगली माहिती द्यावी. किती शेतकरी आहेत, किती अल्प भूधारक आहेत, शेतकऱ्यांना आपण सिंचनाची व्यवस्था देऊ शकलो नाही, शेतकऱ्यांच्या जीवनात अमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न करु शकलो नाही..... सन 2000 मध्ये 61 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या, त्या आता हजारोंच्या संख्येने झाल्या आहेत, त्याबद्दल आपण कधी चिंतन करु शकलो नाही. राजकारणाच्या माध्यमातून आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे उत्तर शोधत असू तर सभागृहामध्ये ज्या महापुरुषांचे फोटो लागले आहेत ते सुध्दा कधीच तुमच्या बाजूने उभे राहणार नाहीत. हे महापरुष आपल्या आशीर्वादाचा उपयोग करतील त्यावेळी त्याचा उपयोग विरोधकांसाठी होणार नाही.

अध्यक्ष महोदय, माजी वित्त मत्री व सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे अतिशय चांगले व्यक्ती आहेत, मित्र आहेत. त्यांनी दिनांक 18 ऑक्टोबर, 1999 रोजी वित्त मंत्री पदाची शपथ घेतली व ते दिनांक 7 डिसेंबर, 2008 पर्यंत म्हणजे साधारणतः 3,339 दिवस वित्त मंत्री होते. मी मनात हिशोब केला की, ते 3,339 दिवस म्हणजे 80,136 तास म्हणजे 48,08,160 मिनिट अर्थ मंत्री होते. मी त्यांना त्यांची भाषणे पाठविली. त्यामध्ये त्यांच्या केवळ 2 सूचना होत्या. त्यातील पहिली सूचना होती की, महसूली तुटीचा अर्थसंकल्प असता कामा नये. मी त्यांच्या या मताशी सहमत आहे. त्यांची दुसरी सूचना होती की, कृषी क्षेत्राच्या प्रमाणिकीकरणाची होती. त्यांनी त्यांचे भाषण वाचावे. मी त्यांचे भाषण मन लावून यासाठी ऐकले की, 3,339 दिवस जो नेता अर्थ मंत्री होता, ज्याला अतिशय उत्तम वारसा आहे, त्या अर्थ मंत्र्यांच्या ज्ञानाचा उपयोग माझ्या सारख्या अतिशय नवीन असलेल्या अर्थ मंत्र्याला होईल. त्यांच्या भाषणातून दोनच गोष्टी दिसून येतात की, पुन्हा एकदा त्यांच्या मनात द्रोणाचार्यासारखे आले असेल चंद्रपूरच्या आदिवासी विभागातून आलेला हा "एकलव्य" याला ज्ञान देता कामा नये. परंतु त्यांनी लक्षात ठेवावे की, त्यांनी जरी ज्ञान दिले नाही तरी मी एकलव्याच्या मार्गावर जाऊन मी या राज्याला "खडखडाटातून खणखणाटाकडे नेल्याशिवाय राहणार नाही". या राज्यातील तिजोरीचा खडखडाट संपवून जनतेच्या शुभकामना व आशीर्वाद घेऊन येणाऱ्या 5 वषार्त राज्याच्या तिजोरीमध्ये खणखणाट केल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर N-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार...........

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाबाबत मी एक खुलासा मांडू इच्छितो की, सन 2016-17 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना मी दिनांक 18 मार्च, 2016 रोजी केलेल्या भाषणातील भाग दोन मधील पृष्ठ क्रमांक 3 वरील शेवटच्या परिच्छेदामध्ये 1993 च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेखाली विलंबित करदायित्व असलेले व्हेरी लार्ज प्रकल्प यामध्ये उत्पादित मालाच्या विक्री देयकावरही सदरहू देयक आता अनिवार्य करण्याचे प्रस्तावित आहे, असा उल्लेख आहे. यामध्ये मेगा प्रकल्पाचा नजरचुकीने उल्लेख राहिला आहे. त्यामुळे उपरोक्त परिच्छेदामध्ये मेगा प्रकल्प व व्हेरी लार्ज प्रकल्प असे वाचण्यात यावे, अशी मी सूचना करीत आहे. काही प्रश्न सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेले आहेत. ते म्हणाले की, निधी कोठे खर्च झाला आहे. फक्त 46 टक्केच खर्च झाला आहे. मी त्यांना नम्रपणे लक्षात आणून देतो की, अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवरुन दिनांक 22 मार्च 2016 पर्यंत एकूण वितरीत झालेल्या निधीच्या 87.92 टक्के निधी खर्च झाला आहे. आणखी 31 मार्च येणे शिल्लक आहे. त्यामुळे आतापर्यंत एकूण 87.92 वितरीत निधी खर्च झाल्याची आपण नोंद घेतली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, हे खरे आहे की, माजी अर्थमंत्री यांनी नव्वानऊ वर्षे बजेट मांडले आहे. त्यांनी एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला असून त्याच्याशी मी सहमत आहे. ते म्हणाले की, महसुली तूट ही कोणत्याही राज्यासाठी आनंद देणारी बाब असत नाही. पण ही महसुली तूट का निर्माण झाली तर राज्यावर जी आपत्ती आली आहे, शेतकरी संकटात आहे, अडचणीत आहे आणि अशा अडचणीच्या समयी मी जर त्या अर्थव्यवस्थेच्या व्याख्येमध्ये राहिलो असतो की, वित्तीय तूट येणे चांगले नाही, तर मी शेतकरी अडचणीत असताना महसुली तूटीचा विचार केला नाही आणि त्या अर्थशास्त्राच्या व्याख्येचाही विचार केला नाही. माझ्यासमोर अर्थशास्त्रातील पुस्तकातील शब्द नव्हते तर माझ्यासमोर होता तो गरीबाचा चेहरा, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याचा चेहरा आणि म्हणून मी महसुली तूट सहन केली आहे. पण मी आपल्या काळातील महसुली तुटीवर येणार आहे. कारण आपण अर्थमंत्री असताना आणि आपत्ती आली नसताना आपली महसुली तूट कशी जास्त होती.

अध्यक्ष महाराज, मी शेतकऱ्यांसाठी 25 हजार कोटी रुपये घोषित केले आहेत आणि काही सन्माननीय सदस्यांना वाटते की, ही दिशाभूल आहे. त्यांना असे वाटते की, हे कोणीच करु शकत नाही. मी हा माझ्याजवळील कागद आपल्यापर्यंत पोहोचवतो. 25 हजार कोटी रुपयांऐवजी मी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार......

शेतकऱ्यांशी संबंधित 23 विभागांसाठी 26819.39 कोटी रुपये दिलेले आहेत. हे 26 हजार 900 कोटी रुपये आहेत. पण दिसायला असे वाटेल की, मी काही तरी आकड्यांची जोड केली आणि आकडे काही तरी पोतडीमधून काढला की, 26 हजार 819 कोटी रुपये. मी याच हेडमधील गेल्या 4 वर्षांचे आकडे पाहिले आणि मी हे आकडे कधीही देण्यास तयार आहे. काँग्रेसच्या राजवटीत याच हेडखाली 2013-14 मध्ये 15005 कोटी रुपये दिले होते. दोन वर्षात मी याच हेडखाली 26819 कोटी रुपये केले आहेत. आपली इतकी कंजुषी कशी असू शकते, पावसाची आपत्ती किंवा दुष्काळ समजू शकतो, पण आपल्याकडे शब्दांचा दुष्काळ आहे की, आपल्याला मोठे मन करुन या सरकारचे अभिनंदन करता आले नाही. आपण सन 2013-14 मध्ये 15 हजार कोटी रुपये दिले आहेत तर आम्ही 26891 कोटी रुपये दिले आहेत. आपण सरकारचे अभिनंदन केले असते तर आपली उंची अजून वाढली असती. पण काय माहिती, आपली उंची वाढूच नये असे ईश्वराच्या मनामध्ये दिसते आहे.

अध्यक्ष महाराज, माजी मुख्यमंत्री सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी विचारले की, कृषी व संलग्न सेवा या हेडखाली भांडवली खर्चासाठी किती तरतूद आहे अशी विचारणा केली. कृषी व संलग्न सेवा कार्यक्रमासाठी गुजरातचा खर्च 6976 कोटी रुपये आहे. मध्यप्रदेशचा खर्च 9132 कोटी रुपय आहे आणि महाराष्ट्राचा खर्च्र हा या वर्षी 13995 इतका आहे. याचा अर्थ शेतकऱ्यांसाठी काम करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. सन 2001 मध्ये शेतकऱ्यांच्या ज्या 62 आत्महत्या झाल्या आहेत. आपण सन 2015 पर्यंत पाहतो आहे की, आत्महत्या थांबत नाहीत, हे खरे आहे. आपल्याला एक मनापासून वाटते की, आत्महत्या ही जगामध्ये आमच्यासाठी चिंता आणि चिंतनाची बाब आहे. जगामध्ये युनोची मान्यता असणारे 193 देश आहेत. युनोची स्वतःची मान्यता असणारे 2 मिळून एकूण 195 देश आहेत. 6 देश असे आहेत की, ज्यांना युनोची मान्यता नाही. या एकूण 201 देशामध्ये आमची लोकसंख्या विचारात घेतली तर महाराष्ट्राची लोकसंख्या जगाच्या 201 देशांपैकी 13 व्या क्रमांकावर आहे आणि भारत दुसऱ्या क्रमांकावरुन कमी केला तर 12 व्या क्रमांकावर आहे. आमची आर्थिक व्यवस्था ही मात्र 36 व्या क्रमांकावर आहे. ही व्यवस्था मागील एक वर्षात केली नाही तर जो वारसा मला आणि या राज्याला आला आहे.

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार......

आर्थिक व्यवस्था ही महसुली तुटीची व्यवस्था आपल्या सरकारच्या नेतृत्वात झाली आहे. हे खरे आहे की, आपल्याला वाटत होते की, हे बदलावे. पण आपण काही करु शकत नव्हता. कारण मला माहिती आहे की आपल्यावर दबाव किती होता. आपल्याकडे अतिशय कल्पक योजना होत्या. पण राईट पर्सन इन रॉन्ग पार्टी हे आपल्याबद्दल चपखल बसते की, ज्ञान होते पण त्या ज्ञानाचा उपयोग करणारे वातावरण त्या ठिकाणी नव्हते. हे वातावरण इकडे आहे. यामध्ये जसे आपले ज्ञान तशी आपल्याला संधी आहे. तिकडे ज्ञान असेल तर संधी नाही. पायामध्ये बेड्या होत्या. म्हणून आपण आज महसुली तुटीबद्दल जे सांगत आहात ती महसुली तूट आपल्याही कार्यकालात आणि सक्षम नेतृत्वामध्ये होती.

अध्यक्ष महोदय, आपल्या निदर्शनास आणून देतो की, 2009-10 मध्ये 8005.68 कोटी रुपये इतकी आपल्या राज्यामध्ये महसुली तूट होती. आपण जे महसुली अधिक्य दाखवित आहात त्याबद्दल मलाही वाटले की, आपण अतिशय उत्तम काम केले आहे. 5576 कोटी रुपयांचे महसुली अधिक्य दाखविले आहे. मला वाटले की, मला हे जमले पाहिजे आणि ही विद्या मी आपल्याकडून शिकली पाहिजे. त्यानंतर माझ्या लक्षात आले की, त्या वर्षी जो प्रोफेशनल टॅक्सचा निधी होता. त्यासंबंधी कायदा आपण बदलला आणि व्यवसाय कराची जी जमा रक्कम होती त्यासाठी कायद्यामध्ये बदल करुन आपण ती राज्याच्या स्टेट पोलमध्ये टाकली आणि त्यातून आपण शिलकीचे अंदाजपत्रक केले. सन 2012-13 मध्ये एक ए.जी.ची चूक झाली आणि आकडे दाखविण्याचे राहून गेले. ते पुढच्या वर्षी दाखवावे लागले आणि म्हणून ते सुध्दा वर्ष महसुली अधिक्याचे होते. त्यामुळे यामध्ये नवीन काही तरी केले आणि एका वर्षात आपली तूट 8005 कोटी वरुन अधिक्य 4291 कोटी रुपयांमध्ये झाली असे नाही तर व्याजाची इंट्री त्या वर्षी टाकण्याचे ए.जी.कडून चूक झाली आणि हे आकडे मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपल्याशी कधीही शेअर करण्यास तयार आहे. नुसते शेअर नाही तर आपण या बाकावर कधीही या आपल्याशी त्यासंबंधी कधीही डिस्कशन करायला तयार आहे की, आपण जे सांगत आहात ते चूक आहे. आपण ही चूक मोठ्या मनाने मान्य कराल. सन 2014 मध्ये महसुली तूट ही 12167 कोटी रुपये एवढी होती. आम्ही येऊन किती दिवस झाले, ही चूक तर मागची होती. कारण मी

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार......

डिसेंबर 2014 मध्ये एक पुरवणी मागणी मांडली आणि मार्च 2015 मध्ये एक पुरवणी मागणी मांडली. त्यामुळे 12137 कोटी रुपयांची तूट आहे, हा आपल्या सरकारच्या यशस्वी नेतृत्वाचा परिणाम होता की, ही तूट आपल्याकडून आमच्याकडे आली आहे. ही तूट आमची नव्हती. पण हे खरे आहे आणि मी मान्य करतो की, ही अतिशय गंभीर बाब आहे की, महसुली तूट वाढता कामा नये. ही तूट शून्यावर आणण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला पाहिजे आणि भविष्यामध्ये या दृष्टीकोनातून प्रयत्न करावे लागतील. पण असे समज गैरसमज कोणी करु नये की, या संदर्भात एका वर्षात आपण हे सर्व करु शकू.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब यांनी विशेषकरुन सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला आणि तो मुद्दा म्हणजे

O-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार............

गुजरात आणि कर्नाटक राज्यांच्या प्लॅनची साईज आपल्या राज्यापेक्षा मोठी आहे. महाराष्ट्रावर विश्वास ठेवण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या वार्षिक योजनेमध्ये सार्वजनिक उपक्रमाच्या नियतव्ययाचा समावेश होतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपल्या माहितीसाठी आकडेवारी सांगत आहे. महाराष्ट्राचे प्लॅन साईज कर्नाटक, गुजरात राज्यापेक्षा मोठे आहेत. मी नम्रपणे आपल्या लक्षात आणून देतो की, त्यांचे प्लॅन साईज महाराष्ट्रापेक्षा मोठे असू शकत नाही. ज्या राज्यात सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्यासारखे नेते आहेत. त्यामुळे महाराष्ट्र मागे राहणार नाही. आपला प्लॅन साईज सार्वजनिक उपक्रमाच्या नियतव्यय हे त्यामध्ये अधिक करीत नाही. मध्य प्रदेशचा प्लॅन साईज सार्वजनिक उपक्रम धरुन 74 हजार 401 कोटीचा आहे. गुजरातचा 85 हजार 557 कोटींचा आहे आणि महाराष्ट्राचा 86 हजार 265 कोटींचा आहे.

**अध्यक्ष :** शाळेचे विद्यार्थी गॅलरीमध्ये बसलेले आहेत. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा काय आदर्श घेतील. सर्वांनी जागेवर बसा.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी घोषणा देत असतात. )

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्त्वावरील सरकार जगामध्ये पुढे जाईल असा विश्वास मी सभागृहाला देतो. याठिकाणी कर्जाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना धन्यवाद देतो. ते असे म्हणाले की, विकासासाठी कर्ज काढा. हे खरे आहे, पण विकासासाठी कर्ज काढणे हा गुन्हा असू शकत नाही. एखाद्याने कर्ज काढून पंचतारांकित हॉटेलमध्ये जेवायला गेला तर ती चूक होऊ शकते.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार सभागृहामध्ये कागद फाडून फेकू नयेत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, पण कर्ज काढून पंचतारांकित हॉटेल बांधले तर ही चूक होऊ शकत नाही. यामध्ये कर्ज काढण्याचा जो दर आहे तो सन 2012-2013 मध्ये राज्याच्या स्थूल उत्पन्नाची टक्केवारी 17 टक्क्यांवर होती आणि यावर्षी ती 16.2 वर आलेली आहे. कर्ज काढण्याचे प्रमाण वाढविलेले नाही पण मी एका मताशी सहमत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, सन्माननीय सदस्य

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार......

श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या मताशीही सहमत आहे की, सिंचनासाठी कर्ज काढायला पाहिजे. पाण्याचा थेंब अन थेंब ही महाराष्ट्राची संपत्ती आहे. या दृष्टीकोनातून येणाऱ्या काळामध्ये नियोजन करणे आवश्यक आहे. हे नियोजन करीत असताना महाराष्ट्राचा विकास दर का वाढला तर भांडवली खर्च केल्याने विकास दर वाढला. मी आकडे वाचून दाखवितो. मागच्या वर्षी 28 हजार कोटी रुपये भांडवली गुंतवणूक सांगितली होती. परंतु वस्तुस्थितीमध्ये ही भांडवली गुंतवणूक 29 हजार 716 कोटी रुपये झाली. सन 2009-2010 मध्ये भांडवली गुंतवणूक 18 हजार 689 कोटी होती. सन 2010-2011 मध्ये 18 हजार 922 कोटी होता. सन 2011-2012 मध्ये 18 हजार 715 कोटी होता. सन 2012-2013 मध्ये 18 हजार 813 कोटी होता. यावर्षी ही भांडवली गुंतवणूक 32 हजार 537 कोटी केला. म्हणजे मागच्या सरकारमध्ये जी चूक झाली होती ती मी दुरुस्त केली आणि 32 हजार 537 कोटी आणि कदाचित पाऊस चांगला आला. सर्व ईश्वराच्या कृपेने झाले तर आणि यामध्ये हा खर्च भागविला पाहिजे या सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या मताशी 100 टक्के सहमत आहे. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, केंद्र सरकारचे अनुदान कमी झाले. अनुदान कमी झालेले नाही. मी अनुदानाचे आकडे वाचून दाखवितो. जेव्हा काँग्रेसचे सरकार केंद्रामध्ये होते तेव्हा सन 2012-2013 मध्ये 14 हजार 322 कोटी हे सहाय्यक अनुदान होते. सन 2013-2014 मध्ये 13 हजार 241 कोटी म्हणजे कमी झाले. सन 2014-2015 मध्ये 20 हजार 140 कोटी सांगितले. मात्र 24 हजार 981 कोटी दिले. म्हणजे सन 2013-2014 च्या तुलनेत मागच्या वर्षी 11 हजार 900 कोटी रुपये केंद्र सरकारने जास्त दिले आणि यावर्षी सुध्दा 24 हजार 964 कोटी इतके केंद्र सरकारचे अनुदान प्राप्त होणार आहे. म्हणजे केंद्र सरकारचे अनुदान कमी झाले हे सांगण्यात येत होते ही अतिशय चुकीची बाब आहे. केंद्र सरकार महाराष्ट्राच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे आणि हे महाराष्ट्र प्रगतीच्या मार्गावर जेव्हाही जाईल तेव्हा केंद्र सरकार आपल्याला मदतच करते हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या अनुमतीवरुन पाहिले. चैत्यभूमीचे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक भूमीतून पाहिले, कोस्टल होळमधून पाहिले.

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार........

अध्यक्ष महोदय, वार्षिक योजना संकुचित होत आहे, छोटी होत आहे, बोन्साय होत आहे अशी भाषा केली गेली. मी आकडे वाचून दाखवितो की, सन 2005-2006 मध्ये 11 हजार कोटीची वार्षिक योजना होती. आता ती 56 हजार 957 कोटी इतकी आहे. सन 2012-2013 मध्ये 45 हजार कोटी होती. सन 2013-2014 मध्ये 49 हजार होती ती 56 हजार 957 कोटी इतकी झ ााली. हे खरे आहे की, प्लॅन साईज वाढल्या पाहिजेत यात दुमत असण्याचे कारण नाही. 15 वर्षाचे अशास्त्रीय नियोजन आणि या अशास्त्रीय नियोजनाला शास्त्रीय नियोजनामध्ये बदलविण्यामध्ये काही कालावधी लागणार आहे. एक वर्षात, 17 महिन्यात 15 वर्षात न झालेली कामे हे आमच्या सरकारकडून अपेक्षित करीत असाल तर कुठेतरी चुकत आहात आणि ही चूक कधीतरी शांतपणे एखाद्या झाडाखाली बसून याचे चिंतन करा, अभ्यास करा. एखाद्या चूक झाडाखाली थंड हवेमध्ये लक्षात येईल की, आपली चूक होत आहे आणि धन्यवाद की, वन विभागाच्या माध्यमातून जर तुमच्या भागामध्ये झाडे कमी असतील तर दिनांक 1 जुलै, 2016 रोजी 2 कोटी झाडे लावण्याचा मी संकल्प केला आहे. त्या निमित्ताने आपल्या भागामध्ये झाडे वाढविण्याचा प्रयत्न निश्चितपणे करेल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी वेलमध्ये घोषणा देत असतात.)

अध्यक्ष महोदय, असा प्रश्न विचारण्यात आला की, वॉटर रिसोर्सेस हा महत्वाचा मुद्दा आहे. सिंचन विभागाचे नाव जलसंपदा करण्यात आले. हे खरे आहे की पाण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशात उत्तर प्रदेशसारख्या राज्यात 44 टक्क्यांपेक्षा जास्त सिंचन आहे. गुजरातमध्ये 56 टक्के, पंजाब हरियाणा राज्याचे तर आकडे वाचताना चिंता वाटते की, महाराष्ट्र एवढा मागे का राहिला. 29 राज्यांमध्ये महाराष्ट्राचा 28 वा क्रमांक आहे. मी झारखंडला धन्यवाद देतो की, त्यांनी जास्त प्रयत्न केले नाही. नाही तर ते महाराष्ट्राच्या पुढे गेले असते आणि शेवटचा नंबर आपला आला असता.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी वेलमध्ये घोषणा देत असतात.)

अध्यक्ष महोदय, वॉटर रिसोर्सेस विभागामध्ये काय केले. मलाही वाटत होते काहीतरी चुकते आहे. कमी पैसे देत आहोत असा माझाही समज झाला. सन 2011-2012 मध्ये जलसंपदा

.......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार........

विभागावर 6 हजार 489 कोटी रुपये इतका खर्च झाला. सन 2012-2013 मध्ये 5 हजार 995 कोटी, सन 2013-2014 मध्ये 7 हजार 36 कोटी, सन 2014-2015 मध्ये 6 हजार 528 कोटी इतका खर्च झाला. पण मी हे अभिमानाने सांगतो की, मागच्या अर्थसंकल्पामध्ये बाकी बजेटच्या फंडबद्दल बोललो नाही. जलसंपदा विभागावर बोलताना सांगितले होते की, नियतव्ययावर जाऊ नका. आमची नियत साफ आहे. जलसंपदा विभागाच्या निधीला 1 रुपयाही कट लावणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील तुम्हाला मित्र म्हणून सांगायला अभिमान वाटतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी वेलमध्ये घोषणा देत असतात.)

P-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देत असतात )

श्री.पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री आता उत्तर देत आहेत. संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेची एकच अपेक्षा आहे की, दुष्काळासाठी ठोस निर्णय कोणते घेतले आणि पाटबंधारे कसे आहे याचे धोरण फक्त जाहिर करा, एवढे पुरेसे होईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, तीन मिनिटे सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे, नंतर मी जलसंपदा विभागाबाबत सांगतो. तुम्ही जलसंपदा विभागाचे तीन मिनिटांचे उत्तर ऐकून घ्यावे. त्यानंतर पुन्हा जसे वाटेल, लोकशाहीबद्दल जो नितांत आदर आहे. तो आदर व्यक्त करा. मला अडचण नाही.

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम 97 अन्वये स्थगन प्रस्ताव दिला होता. आपण दिलेल्या निर्देशानुसार निवेदन करावयाचे आहे. याबाबत पत्र दिलेले आहे. मला निवेदन करण्यास परवानगी द्यावी.

**अध्यक्ष :** निवेदन करण्यास थोडयावेळाने परवानगी देण्यात येईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, सन्माननीय सदस्य श्री.पतंगराव कदम आणि अनेक सन्माननीय सदस्यांनी ठराविक एका गोष्टीबद्दल चिंता व्यक्ती केली. ती म्हणजे सिंचन क्षेत्रात जलसंपदा विभागात जे प्रकल्प आहेत. हे प्रकल्प कोणत्या विधानसभेत, जिल्हयात आहेत हे महत्वाचे नाही ते महाराष्ट्रात आहेत. हे प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. जसा बचाव आयोगाचा विषय सन्माननीय श्री.पतंगराव कदम साहेबांनी सांगितला.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी शांतपणे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मराठवाडयातील जनता पाण्याच्या एका एका थेंबासाठी चिंतेत आहे. मराठवाडया प्रश्न असो, सन्माननीय सदस्य श्री.पतंगराव कदम यांचा पश्चिम महाराष्ट्राचा प्रश्न असो, खांदेशाचा प्रश्न असो, विदर्भाचा असो मागणी एकच आहे. हा गोंधळ चालू असल्यामुळे तुम्हाला उत्तर ऐकू देत नाहीत. यासंदर्भामध्ये आपण सांगितले की, गुजरातने पैसे ठेवले आहेत, आंद्र प्रदेशने ठेवले आहेत. या वर्षी आपण सात हजार आठशे सत्तावन कोटी ठेवले.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार....

मध्य प्रदेशने सात हजार चारशे पंच्यानव्व कोटी ठेवले, आंद्र प्रदेशने सात हजार तीनशे पंचवीस कोटी ठेवले आहेत. तेलंगणाने मात्र सव्वीस हजार सहाशे पंचवीस कोटी रुपये जलसंपदासाठी ठेवले आहेत. गुजरात, आंद्रप्रदेश, मध्यप्रदेशने जरी कमी पैसे ठेवले असतील तरी तेलंगणाने मात्र सिंचनावर चांगले पैसे ठेवले आहेत. आमचे माननीय जलसंपदा मंत्री हे कर्तुत्वान मंत्री आहेत. जलसंपदा मंत्री महोदय आणि माननीय मुख्यमंत्री यांची बैठक झाली. आम्हाला हे प्रकल्प वेगाने पूर्ण करायचे आहेत. ते पूर्ण करण्याचा निर्णय केला आहे.

( विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्या माननीय अध्यक्षांच्या आसनासमोर येऊन घोषणा देत असतात, काही सन्माननीय सदस्यांनी वेलमध्ये उभे राहून कागदे फाडून उडविली )

**अध्यक्ष :** सन्माननीय महिला सदस्यांनी खाली उतरावे नाही तर मला सस्पेंड करावे लागेल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मला एका गोष्टीचे दु:ख झाले. ते माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले की, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी फक्त 5 कोटी रुपयांची तरतूद केली. त्यांच्या स्मारकासाठी आम्ही 100 कोटी रुपयांची तरतुद केली आहे. त्यांच्या वाचण्यामधून काही गैरसमज होतो आहे असे मला वाटते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यावर जे भाष्य केले. ते यावर्षीची जी तरतूद आहे ती .001 टक्के आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्यासाठी एक महापुरुष आहेत. राज्य चालविण्याचा मंत्र देणारा जाणता राजा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले की, बेशुध्द माणूस सुध्दा शुध्दीवर येतो. एकदा जोराने छत्रपती शिवाजी महाराज म्हणा तुमच्या रक्ताचा प्रत्येक थेंब हा चैतन्याने भरतो. त्यांचे स्मारक उभे करताना आम्ही कशी कंजूशी करु. या महापुरुषाच्या स्मारकासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु देशामध्ये कोठे स्मारक होत असतील तेथे महाराष्ट्राचा थोडासा वाटा असावा हा आम्ही प्रयत्न केला.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार.......

अध्यक्ष महोदय, ज्यांनी स्वराज्य माझा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच असा छाती टोकून बोलणा-यावर राजद्रोहाचा गुन्हा झाला. त्या लोकमान्य टिळकांचे स्मारक पाच कोटी रुपयांचे नाही. त्यांचे आव्हान आज आवश्यक आहे. त्यांचे आव्हान लोकशिक्षणाचे असेल, लोकसंवादाचे असेल, समाज एक करण्याचे असेल, समाजामध्ये अशा पध्दतीने मन विभागण्याचा जो कोणी लोक आहेत. ते फक्त खुर्चीवर प्रेम करतात, कधी म्हणतात जोरसे बोलो, हेच जर आपण शेतक-यांसाठी जोरसे बोलला असता तर अशा पध्दतीने एका राईचा पर्वत करण्याची आवश्यकता पडली नसती. खोटे बोलून मतासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता पडली नसती. लोकांनी जसे फुल तुमच्यावर वहावे, तशी मते वाहीली असती, पण आता तुमचा खरा चेहरा अकरा कोटी सत्यान्नव लाख लोकांपर्यंत गेला आहे. सनन्माननीय सदस्य श्री.जयंतराव सावध व्हा. सावध होऊन हिकडे या. तिकडे दिवस चांगले नाहीत.

अध्यक्ष महोदय, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, काँग्रेस हे जळत घेर आहे. महात्मा गांधीजींनी सांगितले होते की, काँग्रेस विसर्जित करा, हे गांधीजींचे स्वप्न महाराष्ट्राची जनता पुढच्या काळामध्ये पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही. आपण विचारले की, हायब्रिड एम.यु.टी. मॉडेल काय आहे ? तुमची ऐकण्याची मन:स्थिती दिसत नाही. हायब्रिड एम.यु.टी. मॉडेल यामध्ये राज्य शासन प्रकल्प किंमतीच्या 40 ते 50 टक्के अर्थ सहाय्य कंत्राटदारास करते, उर्वरित रक्कम ही 10 वर्षे द्यायची याला हायब्रिड एम.यु.टी. धोरण म्हणतो. आपण एक नवीन प्रश्न उपस्थित केला, तुम्ही म्हणालात बी.ओ.टी. बंद केला. जे 53 टोल नाके आहेत. त्यावर चार चाकी लाईट मोटर व्हेईकला बंद केले. 53 टोल नाके पूर्ण बंद झाले नाहीत. त्यामुळे जेव्हा शिळफाटयाचा नवीन बी.ओ.टी. चा प्रकल्प तो प्रकल्प लाईट मोटर व्हेईकलमुळे बंद आहे. बी.ओ.टी. तत्वावर कामच करायचे नाही असा निर्णय केलेला नाही. यातून तुमच्या लक्षात येईल की, बी.ओ.टी. तत्वावरच्या धोरणाबद्दल म्हणालात की, हे सरकारने बंद केले आहे. तर शिळफाटयाचे काय ?

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मुद्दाम सन्माननीय महिला सदस्यांना वर पाठविले आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी या दोन पक्षामध्ये मतभेद व्हावेत, असा मनापासून भाषणातून प्रयत्न केला गेला आहे.

**अध्यक्ष :** माझ्या आई बहिणींनो आपण खाली जाऊन आपल्या जागेवर बसावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : पाण्यावर काटी मारली तरी पाणी दुभंगणार नाही तसे दोन पक्ष एकत्र आहेत. शिवसेना आणि भाजपमध्ये छोटया मोठया गोष्टींवर मतभेद होत असतील, हे मतभेद तुम्हाला सत्तेत आणण्यासाठी उपयोगी पडतील हा तुमचा गैरसमज काढून टाका. "हम दोस्त है, दोस्त रहेंगे और मरते दम तक दोस्ती निभाएंगे" कधी एखाद्या निवडणूकीत कमी जास्त होत असेल आपण सांगितले की, शिवसेनेच्या खात्यांच्या मंत्र्यांना निधी कमी दिला. तुम्ही असंतोषाचे जनक बनण्याचा प्रयत्न करत होता. हे फक्त लोकमान्य टिळकांना शोभून दिसते. ते काही तुम्हाला शोभून दिसत नाही. आम्ही असंतोषाचे जनक आहोत. तुम्ही शिवसेना भाजपमध्ये भांडण लावण्याचे काम करायचे. तुम्ही सांगितले शिवसेनेच्या मंत्र्यांच्या विभागाना निधी किती दिला आहे ते वाचून दाखवितो. माननीय श्री.दिवाकर रावते यांच्या विभागाला एकूण निधी योजना व योजने अंतर्गत 1963 कोटी रुपये, माननीय श्री.सुभाष देसाईंच्या विभागाला 3050 कोटी रुपये, डॉ.दिपक सावंत यांना योजनाअंतर्गत व योजनेत्तर 5372 कोटी रुपये दिले. याची आपल्याला माहिती आहे. काही विभागामध्ये नॉन प्लॅन खर्च जास्त असतो. उद्योग विभागामध्ये नॉन प्लॅनचा खर्च असतो. तेथील उद्योगांना आपण अनुदान देतो. तुम्ही ज्या भावनेने, तुमची पवित्र आणि भव्यदिव्य भावना होती, की भाजप शिवसेनेमध्ये मतभेद व्हावेत.

(विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्या माननीय अध्यक्षांच्या आसनासमोर येऊन घोषणा देत असतात व काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देत असतात )

Q-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

(विरोधी पक्षाच्या अनेक महिला सन्माननीय सदस्या डायसवर चढून घोषणा देत असतात)

श्री.सुधीर मुनगंटीवार .....

भाजपा शिवसेनेत काही तरी मतभेद व्हावेत व 2019 च्या अगोदर तुम्हाला पुन्हा एकदा लाल दिव्याच्या गाडीमध्ये बसण्याची संधी प्राप्त व्हावी यासाठी भांडण लावू नका. यापेक्षा चांगला महामार्ग तुम्हाला मी सांगतो की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सरकारमध्ये यावे व लाल दिव्याच्या गाडीमध्ये बसावे. पण राज्याचे नुकसान करुन लाल दिव्याच्या गाडीचे स्वप्न तुम्ही चुकूनही बघू नका.

**अध्यक्ष** : माझ्या आई बहिणींनो आपण खाली जाऊन आपापल्या जागेवर बसा.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, लाल दिव्याच्या गाडीवर प्रेम करणारे नव्हे तर लाल रक्ताच्या शेतकऱ्यांवर प्रेम करणारे आम्ही माणसे आहोत त्यामुळे तुम्ही याबाबत चिंता करु नका. सन्माननीय सदस्यांनी सी-वर्ल्डचा विषय काढला आहे, याकरिता आम्ही 120 कोटी रुपये निधी दिलेला आहे. खूप मुद्दे आहेत पण विरोधी पक्षाच्या सदस्यांना ऐकायचे नाही.

अध्यक्ष महोदय, 2-3 सन्माननीय सदस्यांनी काही आग्रही मागण्या केलेल्या आहेत. आता माझ्याकडे चिठ्ठी आलेली आहे. यातील काही बाबींचा खुलासा करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू यांनी हुतात्मा स्मारकाबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. हुतात्मा स्मारकाचे काम डायरेक्ट माझ्या खात्याकडे येत नसले तरी मी त्यावर स्वतः मॉनीटरींग करीत आहे. हुतात्मा स्मारक हे माझ्यासाठी, तुमच्यासाठी, राज्यासाठी प्रेरणा देणारे आहे, त्या दृष्टीकोनातून याबाबत मी विचार करणार आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर चढून एकत्रितपणे घोषणा देत असतात)

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी डायसच्या खाली उतरावे व आपापल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन सपकाळ, श्री.जयकुमार गोरे, प्रा.विरेंद्र जगताप यांनी डायसच्या खाली उतरावे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विरेंद्र जगताप यांनी श्री संत गुलाबराव महाराज जन्मस्थळ तालुका नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती या तीर्थक्षेत्राबाबत मागणी केलेली आहे. याकरिता माननीय मुख्यमंत्री यांच्या निदेशानुसार 7.22 कोटी रुपये निश्चितपणे टप्प्याटप्प्याने मी उपलब्ध करुन देईल. सन्माननीय सदस्य श्री.हरिष पिंपळे यांनी मागणी केली की, संत गाडगे बाबांच्या स्मारकासाठी शासनाने भविष्यात विचार करावा. संत गाडगेबाबांच्या स्मारक व त्यांच्या अमरावती जिल्हयातील समाधी मंदीर व इतर बाबतीत त्यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन हे काम निश्चितपणे करू. सन्माननीय सदस्य प्रा.मेधा कुलकर्णी यांनी महत्वाचा विषय उपस्थित केला. निर्मल भारत अभियान अंतर्गत लोणी, यवत येथे खाजगी प्रयत्नातून स्वच्छतागृहे बसविली आहेत त्याचे रिझल्ट चांगले आहेत. याबाबत सन्माननीय सदस्य व संबंधितांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, महात्मा गांधी यांनी महत्वाचे भाष्य केले होते. ते म्हणाले की, कोणत्याही संस्थेचे महत्व रुपये पैशाने मोजावयाचे नसून जनतेचे सामर्थ्य वाढविण्याचे कार्य ही संस्था किती प्रमाणात करते यावर ते मापले पाहिजे. म्हणून शेतकरी स्वाभीमान वर्षाची घोषणा केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी देशभरातून मदत करण्याचा निर्णय होत आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे अशा केलेल्या घोषणेनुसार हे शेतकरी स्वाभीमान वर्ष आहे. यातून आम्ही शेतकऱ्यांना स्वाभीमानी मार्गावर नेऊ. मला निश्चितपणे विश्वास आहे की, आम्ही त्या मार्गाने निघालो आहोत. आज विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उत्तर ऐकत नाहीत. पण जनता असा धडा शिकवेल की, त्यांना पुन्हा कधीच उत्तर ऐकण्यासाठी सभागृहात पाठविणार नाहीत हा विश्वास व्यक्त करतो व मी मांडलेल्या अर्थसंकल्पाला पाठींबा देणाऱ्या सदस्यांना धन्यवाद देतो.

**अध्यक्ष** : सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा समाप्त झाली आहे.

-----

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** लेखानुदानावरील प्रस्ताव

**मु.शी.:** वित्तमंत्री यांचा सन 2016-2017 चा लेखानुदानावरील प्रस्ताव

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्तमंत्री) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम 262 अन्वये 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी लेखानुदानाचा खालील प्रस्ताव या सभागृहासमोर सादर करीत आहे.

"सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी अनुसूचित दर्शविलेल्या शीर्षाप्रमाणे व मागण्यांप्रमाणे 47 हजार 341 कोटी 94 लक्ष 5 हजार रुपये यापेक्षा अधिक खर्च होणार नाही इतकी रक्कम राज्यपालांना आगाऊ मंजूर करण्यात यावी."

हा प्रस्ताव विचारात घेण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 206 सह अनुच्छेद 203 चा खंड (3) अन्वये राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी या सन्माननीय सभागृहास शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** विनियोजन (लेखानुदान) विधेयक

L.A. BILL NO. X OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2016-2017.)

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्तमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 10 राज्याच्या एकत्रित निधीतून 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

**अध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 10 राज्याच्या एकत्रित निधीतून 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**अध्यक्ष**: विधेयक विचारात घेण्यात आले आहे.आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल

खंड 2 व 3, अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 10 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**अध्यक्ष** : सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 10 संमत झाले आहे.

-----

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यातील दंतवाडी येथे एका विद्यार्थीनीची व तिच्या वडीलांची करण्यात आलेली निर्घृण हत्या

**मु. शी.** : पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यातील दंतवाडी येथे एका विद्यार्थीनीची व तिच्या वडीलांची करण्यात आलेली निर्घृण हत्या या विषयावर श्री.अजित पवार, वि.स.स यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय श्री.अजित पवार यांनी " पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यातील दंतवाडी येथे एका विद्यार्थीनीची व तिच्या वडीलांची करण्यात आलेली निर्घृण हत्या" या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे.

( **प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-----

यानंतर आर-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे मला अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक पंधरा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 50 मिनिटांनी, 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर)**

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर)**

**पृ.शी. :** नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.** : नियम स्थगित ठेवण्याबाबत माननीय वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. सुधीर मुनगंटीवार ( वित्तमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम 57 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम 251 (1) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

.......2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज सकाळपासून आम्ही एका विषयाच्या संदर्भात सातत्याने मागणी करीत आहोत.

**तालिका सभाध्यक्ष** : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांना बोलण्याची संधी देणार आहे. तत्पूर्वी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी वेलमधील सन्माननीय सदस्यांना आपापल्या जागेवर बसण्याबाबत सांगावे.

विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. मी सन्माननीय सदस्य प्रा. वर्षा गायकवाड यांना सांगू इच्छितो की, आपण सत्तेत असताना मंत्री म्हणून काम करीत होत्या. सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे यांनी जागेवर जाऊन बसावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी....(अडथळा)....शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. महाड येथील चवदार तळे या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान होत आहे. "जय भीम" असे म्हटल्यानंतर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जात असेल तर ते अतिशय चुकीचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, हा विषय झालेला आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात येऊन या विषयी खुलासा करण्याची गरज आहे. राज्यामध्ये दररोज अशा प्रकारच्या गंभीर घटना घडत आहेत. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. सरकारला या विषयाबाबत कोणतेही गांभीर्य नाही, असे दिसून येत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आज सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाचा पहिला दिवस आहे. एकूण चार विभागातील मागण्यांवर चर्चा व मतदान होणार आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी एका महत्वपूर्ण विषयाकडे शासनाचे लक्ष वेधणार आहे. संबंधित शेतकऱ्याने मंत्रालयासमोर विष प्राशन करुन आत्महत्या केलेली आहे. अशा शेतकऱ्याला सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्याची गरज आहे. आज शेतकरी आत्महत्या करीत आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे.

अध्यक्ष महोदय, आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी करीत आहोत.

.........3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : विरोधी पक्षाने जो विषय उपस्थित केलेला आहे, त्या विषयावर माननीय अध्यक्षांनी रुलिंग दिलेले आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी करीत आहोत. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात येऊन खुलासा करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यात "जय भीम" म्हटल्यानंतर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जात असेल तर अशा प्रकारची राज्य शासनाची मानसिकता आहे काय ?

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्षनेत्याला सांगू इच्छितो की, हा विषय वेगळा आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येत असल्यामुळे मी बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे "विश्व गौरव" व्यक्तीमत्व आहेत. "जय भीम" असे म्हटल्यानंतर देशद्रोहाचा गुन्हा दाखल होऊ शकतो काय ? विरोधी पक्षाने कृपा करुन राईचा पर्वत करु नये. विरोधी पक्षाकडून प्रत्येक गोष्टीचे राजकारण केले जात असून, ते अतिशय चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्याला अशी चर्चा करावयाची आहे काय ? खरे तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस हे जळते घर आहे, असे म्हटले होते. असे का म्हटले ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न ही पदवी दिली नव्हती. यावरुन आपल्याला काय म्हणावयाचे आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.सुधीर मुनगंटीवार....

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना ज्यांनी पराभूत केले ते काँग्रेसचेच लोक आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील म्हणूनच आपण वेगळा पक्ष स्थापन केला. काँग्रेसचे लोक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर श्रध्दा ठेवत नाहीत. या काँग्रेस पक्षाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना समितीमध्ये येऊ दिले नाही. अपूर्ण आणि चुकीच्या माहितीवर सभागृहाचे कामकाज न होऊ देणे हे लोकशाहीला अभिप्रेत नाही. हे विधानसभेचे पवित्र्य कामकाज असून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेनुसार चालते, त्या घटनेचा अनादर करु नका, अशी माझी काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. या घटनेचा अनादर होईल अशी कृती आपण कृपया करु नका. सन्माननीय सदस्यांना विषय मांडता येतात...

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती असल्यामुळे मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नाही त्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 11 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

----------------

यानंतर U-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर )**

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

**पृ. शी. :** अनुदानाकरिता मागण्या

**मु. शी. :** सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाकरिता मागण्या :

1. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
2. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
3. आदिवासी विकास विभाग
4. उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : आता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ई-2, ई-3, ई-4, ई-5, एस-1, एस-2, एस-3, एस-4, एस-5, टी-2, टी-3, टी-4, टी-5, टी-6, टी-7, टी-8, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-5, डब्ल्यू-6, डब्ल्यू-7, डब्ल्यू-8, डब्ल्यू-9 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिके बरोबर वितरित केला आहे.

( प्रेस : सोबत जोडलले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे )

............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

**तालिका सभाध्यक्ष** : या मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहीत धरुन आता चर्चेला प्रारंभ होईल. आता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होईल. मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांच्या विभागनिहाय याद्या सदस्यांना टपालखणाद्वारे ( पिजन होल ) वितरित करण्यात आल्या आहेत. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै, 2010 पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आता चर्चेला सुरुवात होईल. माननीय विरोधी पक्ष नेते आपण चर्चेला सुरुवात करावी.

**मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात निवेदन करावे या मागणीबाबत**

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहात अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होणे बरोबर आहे. परंतु, आमची मागणी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात येऊन निवेदन केले पाहिजे. ... ( अडथळा ) ....

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेते माझी विनंती आहे की, आपण अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावी. आज महत्त्वाच्या 4 विभागांच्या मागण्यांवर चर्चा आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सरकार निवेदन करण्यास का घाबरत आहे ? एवढ्या महत्त्वाच्या घटना झाल्यानंतर सरकार निवेदन करण्यास का घाबरत आहे ?

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेते आता आपल्याला बाकीच्या विषयांवर बोलता येणार नाही. आपण बाकीच्या विषयांवर बोलू नका. 4 विभागाच्या मागण्यांवर आपण बोलावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यासमोर एवढी गंभीर समस्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान या राज्यात होत आहे. या राज्यात त्यांच्या विचारांना तिलांजली दिली जात आहे. या प्रकरणात जय भीम बोलणाऱ्या लोकांविरुध्द राष्ट्रदोहाचा गुन्हा दाखल होत आहे. अशावेळेस मुख्यमंत्री महोदयांनी ... ( अडथळा ) ...

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेते आपल्याला अनुदानाच्या मागण्यांवर बोलायचे नाही असे समजायचे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आमची विनंती आहे की, राज्याच्या जनतेची माफी राज्य सरकारने मागितली पाहिजे, मुख्यमंत्री महोदयांनी मागितली पाहिजे, हा आमचा आग्रह आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात येऊन राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेते आपण अनुदानाच्या मागण्यांवर बोलावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, महाड येथे जलपूजनाच्या नावाखाली चवदार तळ्याचे शुध्दीकरण करण्याचा प्रयत्न होतो. राज्यातील, देशातील तमाम दलित बांधवांचा अवमान करण्याची भूमिका या निमित्ताने झालेली दिसते. धम्म परिषदेमध्ये समाजकंटक जातात, पोलीस त्या ठिकाणी गुन्हे दाखल करीत नाहीत .... पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये ... ( अडथळा ) ...

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्यांना वारंवार विनंती करुनही ते मागण्यांवर बोलण्यास इच्छुक नसल्याने मी, आता संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना विनंती करतो, की त्यांनी मागण्या मंजूर करण्याबाबत सभागृहास विनंती करावी.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय अध्यक्षांसमोर घोषणा देतात )

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपण मागण्यांवर बोलले पाहिजे होते.

श्री. विनोद तावडे ( शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने शालेय शिक्षण क्रीडा विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक ई-2, ई-3, ई-4, ई-5 अंतर्गत योजनेतर योजनेखालील रुपये 40,205 कोटी, 21 लाख, 22 हजार आणि योजनांतर्गत योजनेखालील 2316 कोटी, 22 लाख, 46 हजार अशा एकूण 42,621 कोटी, 42 लाख, 68 हजार रुपयांच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी सभागृहास विनंती करतो.

V-1/....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष :** आता वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्य विभागाच्या मंत्री महोदयांना विनंती करतो, की त्यांनी मागण्या मंजूर करण्याबाबत सभागृहास विनंती करावी.

श्री. विनोद तावडे ( वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्य मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या आर्थिक वर्षासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या योजनेतर 2270.46 कोटी व योजनांतर्गत 137.13 कोटी असे एकूण 2407.59 कोटी रुपये इतक्या अर्थसंकल्पीय तरतुदीस सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी आपल्या अनुमतीने सभागृहास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागणी क्रमांक डब्ल्यु-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-5, डब्ल्यू-6, डब्ल्यू-7, डब्ल्यू-8, डब्ल्यू-9 साठी सन 2016-2017 करिता मागणी करण्यात आलेल्या योजनेतर योजनांसाठी रुपये 6 हजार 345 कोटी 46 लाख 48 हजार व योजनांतर्गत योजनांसाठी 482 कोटी 38 लाख 84 हजार असे एकूण 6 हजार 827 कोटी रुपये 85 लाख 32 हजार फक्त एवढ्या रकमेच्या अनुदानाच्या मागण्या मान्य करण्याची मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी मागण्या मंजूर करण्याबाबत सभागृहास विनंती करावी.

सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. आपण आपल्या मांगण्या मांडाव्यात. आपल्याला अजून संधी आहे.

श्री. विष्णू सवरा ( आदिवासी विकास मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या आदिवासी विकास विभागाच्या 8 हजार 357 कोटी 71 लाख रुपयाच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन 2016-2016 या अर्थसंकल्पातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्य विभाग, आदिवासी विकास विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ई-2, ई-3, ई-4, ई-5, एस-1, एस-2, एस-3, एस-4, एस-5, टी-2, टी-3, टी-4, टी-5, टी-6, टी-7, टी-8, डब्ल्यु-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-5, डब्ल्यू-6, डब्ल्यू-7, डब्ल्यू-8, डब्ल्यू-9 आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष.....**

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक 29 मार्च 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.32 वाजता मंगळवार, दिनांक 29 मार्च 2016 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION